रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३२४
www.ramprahar.com

# राम प्रहर

सोमवार, १२ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

वाशीत औरंगजेबाचे स्टेटस; युवकावर गुन्हा दाखल/२
नेरळ ग्रामपंचायतीने अतिक्रमण हटविले/७
फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत श्वीऑनटेका विजेती/८






## आनंदवार्ता! अखेर मान्सून महाराष्ट्रात दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**
महाराष्ट्रातील प्रत्येक जण ज्याची गेल्या काही दिवसांपासून आतुरतेने वाट पाहत होते त्या मान्सूनचे रविवारी (दि. ११) राज्यात आगमन झाले. दक्षिण महाराष्ट्रातील रत्नागिरीमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाकडून ही माहिती देण्यात आली. दरवर्षीच्या तुलनेत मान्सून यंदा उशिरा आला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक मान्सून कधी दाखल होणार याकडे डोळे लावून बसले होते. अखेर राज्यात मान्सूनचे आगमन झाले आहे. महाराष्ट्रात रत्नागिरीपर्यंत मोसमी पाऊस पोहचला आहे. केरळमध्ये



८ जून रोजी मान्सून दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनतर महाराष्ट्रात तो दाखल झाला आहे. राज्यात सामान्यपणे मोसमी पाऊस ७ जून रोजी दाखल होतो, पण अरबी समुद्रात निर्माण झालेल्या बिपरजॉय वादळामुळे यंदा केरळमध्येच मोसमी पाऊस उशिराने दाखल झाला होता. त्यानंतर त्याची वाटचाल वेगाने झाली आहे. दरम्यान, शेतकरी खरीप हंगामाच्या पेरणीसाठी मशागतीची कामे करीत आहेत. मान्सूनचे आगमन दक्षिण महाराष्ट्रात झाल्याने शेतीच्या कामांना वेग येणार आहे. गतवर्षी अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाने हैराण झालेल्या शेतकऱ्याला यंदाच्या मान्सूनकडून अपेक्षा आहेत. मान्सूच्या पुढील प्रवासासाठी अनुकूल वातावरण तयार झालेय. त्यामुळे राज्यात पुढील चार ते पाच दिवस मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

# भारत जागतिक महासत्ता बनणार

## भाजप नेत्यांचा विश्वास; ठाण्यात महासंपर्क अभियान उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**
**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मोदी @ ९ अंतर्गत ठाण्यात रविवारी (दि. ११) भारतीय जनता पक्षाच्या वतीने ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या महाजनसंपर्क अभियान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपस्थित नेत्यांनी पंतप्रधान मोदींच्या अधिपत्याखाली भारत जगात महासत्ता बनेल, असा विश्वास व्यक्त केला.**



ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात झालेल्या या मेळाव्यास राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, पर्यटन विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, डॉ. संजीव नाईक, आमदार गणेश नाईक, संजय केळकर, मंदाताई म्हात्रे, गीता जैन, ठाणे जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार संदीप नाईक, नरेंद्र मेहता, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने जी काही आश्वासने दिली होती ती पंतप्रधान मोदी यांनी पूर्ण केली आहेत. भाजपचा विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी दिलेला अंत्योदयाचा आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी सुरू केलेल्या कल्याणकारी योजना कार्यकर्त्यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचवाव्यात.

मंत्री रवींद्र चव्हाण यांनी शत प्रतिशत भाजपसाठी काम करून विरोधकांना आपली ताकद दाखवून द्या, असे म्हटले.

नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा विक्रमी बहुमताने पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी कंबर कसण्याचे आवाहन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

आमदार गणेश नाईक यांनी देशाच्या विकासाची गती कायम ठेवण्यासाठी २०२४मध्ये जनता नरेंद्र मोदी यांनाच पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करेल, असा विश्वास व्यक्त केला.

जे साठ वर्षांत झाले नाही ते पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात केवळ नऊ वर्षांत झाले, अशा शब्दांत आमदार संजय केळकर यांनी मोदी सरकारच्या कार्यकाळाचा गौरव केला.

माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनीही पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळातील कामगिरीवर प्रकाशझोत टाकून नियोजनबद्धरित्या कार्य करण्याचा सल्ला कार्यकर्त्यांना दिला.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत विश्वगुरू बनण्याच्या दिशेने वाटचाल करतो आहे, असे आमदार गीता जैन म्हणाल्या. इतर मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली.

आमदार निरंजन डावखरे यांनी प्रास्ताविक केले. महाजनसंपर्क अभियान मेळाव्याच्या प्रारंभी ओडिशात रेल्वे अपघातामध्ये मृत पावलेले प्रवासी, ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना आणि अभिनेते गुफी पेंटल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# उरणमध्ये विविध पक्षांचे सरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश

## आमदार महेश बालदी जनतेशी नाळ जोडलेले नेते -आमदार प्रशांत ठाकूर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**
उरण विधानसभा मतदारसंघाचा विकास करण्याचे काम आमदार महेश बालदी यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून अनेक गावांतील विविध पक्षांचे आजी माजी सरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. भाजपचा जिल्हाध्यक्ष म्हणून मला ही अभिमानाची बाब असून तळागाळातील लोकांशी नाळ जोडलेला नेता म्हणून महेश बालदी यांच्याकडे उरणची जनता बघत आहे, असे प्रतिपादन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी उरण येथे केले. ते कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश कार्यक्रमात बोलत होते.

उरण भाजपच्या वतीने शनिवारी (दि. १०) जेएनपीए सभागृहात कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर, खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, विनोद साबळे, श्रीनंद पटवर्धन, मिलिंद तावडे, कामगार संघटना जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत, ओबीसी सेल उपाध्यक्ष निळकंठ घरत, भाजप उरण शहराध्यक्ष कौशिक शाह, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शहर अध्यक्ष संपूर्णा थळी, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी जि.प. सदस्य विजय भोईर, ज्ञानेश्वर घरत, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, मुकुंद गावंड, कुलदीप नाईक, प्रकाश ठाकूर, अजित पाटील केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, दिनेश तांडेल, संगीता पाटील, निर्मला घरत, जान्हवी पंडित, हितेश शाह, हस्तीमल मेहता, मनोहर सहतीया, हेमंत म्हात्रे, समीर मढवी, शशिकांत पाटील, शेखर तांडेल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, उरण मतदारसंघात माजी आमदार मनोहर भोईर यांचे नेतृत्व डबघाईस आले आहे. आज या मतदारसंघात उद्धव ठाकरे गटाची अवस्था बिकट झाली आहे, तर शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांनी ५२९ कोटींचा घोटाळा केला. त्यामुळे जनतेचा विश्वासघात करणारे व पैसे बुडविणारे विवेक पाटील जेलची हवा खात आहेत. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आहे. अशा सरकारांच्या माध्यमातून या मतदारसंघाचा विकास आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून होत आहे. त्यांनी अंधारात चाचपडणाऱ्या घारापुरी बेटावर लाईट आणण्याचे काम कोणतेही पद नसताना या अगोदर केले आहे. यापुढेही सर्वांगीण झाल्याशिवाय ते राहणार नाहीत. (पान २ वर..)

### विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही -आमदार महेश बालदी

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांचे स्वागत करताना आमदार महेश बालदी म्हणाले की, उरण मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याचे भाग्य मला लोकसेवक म्हणून लाभले आहे. या भागातील गरजवंतांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मी पुढाकार घेतला आहे. उरणमधील रेल्वेस्थानकांच्या नामकरणासाठी गावकऱ्यांच्या पाठिशी उभा राहणार आहे. ठाकरे सरकार गेले. आता खऱ्या अर्थाने भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले आहे. त्यामुळे या मतदारसंघात यापुढे निधीची कमतरता भासू देणार नाही.

# ऑनलाईन धर्मांतरप्रकरणी आरोपीला अलिबागेतून अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**
ठाण्यातील मुंब्र्यात झालेल्या ऑनलाईन धर्मांतरप्रकरणी शाहनवाज मकसुद खान या मुख्य आरोपीला अलिबागच्या मांडवी मोहल्ला येथून अटक करण्यात आली. मुंब्रा पोलिसांनी ही कारवाई केली.



उत्तर प्रदेशच्या गाझियाबादमधील धर्म परिवर्तन प्रतिषेध अधिनियम २०२१ कलम ३,५(१) या गुन्ह्यातील फरारी आरोपी शहानवाज उर्फ शानु मकसुद खान (वय २३, रा. मुंब्रा, जि. ठाणे) याचा शोध सुरू होता. त्याला मुंब्रा पोलीस ठाण्याच्या पथकाने अलिबाग पोलिसांच्या मदतीने एबी कॉटेज, मांडवी मोहल्ला ताब्यात घेतले. आरोपीला पुढील चौकशीसाठी मुंब्रा पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे.

हिंदू धर्मीय मुलांचे ऑनलाइन गेमद्वारे धर्मांतर होत असल्याची नोटीस उत्तर प्रदेशातील गाझियाबाद पोलिसांनी बजावली होती. या प्रकरणाचे मुंब्रा कनेक्शन समोर आले. यातील मुख्य आरोपी शाहनवाज खान हा आपल्या कुटुंबीयांसोबत मुंब्रा येथील देवरी पाडा परिसरात रहाणार असल्याची माहिती गाझियाबाद पोलिसांना मिळाली.

या माहितीनुसार उत्तर प्रदेश एसटीएफचे पथक आरोपीच्या शोधासाठी मुंब्र्यात दाखल झाले होते, मात्र तो कुटुंबीयांसह तेथून फरार असल्याचे स्पष्ट झाले. (पान २ वर..)

# भीषण अपघातात चौघे ठार, महिला जखमी

**नेवासा : प्रतिनिधी**
अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नेवासा तालुक्यातील वडाळा (बहिरोबा)जवळ कार व आयशर टेम्पोची धडक होऊन चार जण ठार, तर एक महिला जखमी आहे. इंदौर येथील भाविक देवदर्शनासाठी जात असताना रविवारी (दि. ११) सकाळी हा अपघात झाला.

अहमदनगरकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जात असलेल्या कारच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार (एमएच १४-एससी ९००७) दुभाजकावर धडकून समोरून येणाऱ्या आयशर टेम्पोला (एमएच ४८-टी ५३१९) धडकली. अपघात एवढा भीषण होता की जागेवर तिघांचा मृत्यू झाला, तर एकाचा उपचारापूर्वी मृत्यू झाला असून मृतांमध्ये सर्व पुरुष असून एक महिला जखमी आहे.

या अपघातात राहुल परमेश्वर शर्मा (वय २७, रा. कलंदी गोल्ड सिटी इंदोर), हर्ष मनोहर शर्मा (वय १८, रा. रतलाम, मध्य प्रदेश), योगेश परमेश्वर शर्मा (वय २४, रा. कुंडली जिल्हा धार, मध्य प्रदेश), अविनाश मंडलेचा (वय २५, रा. महालक्ष्मी हिवरे, ता. नेवासा जि. अहमदनगर) मयत झाले आहेत. राणू परमेश्वर शर्मा (वय २६, रा. गोल्ड सिटी, इंदोर) या जखमी असून त्यांच्यावर नेवासा फाटा येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## निवडक

### मुंबईत आग; सहा जण जखमी

**मुंबई** : धारावी परिसरात ९० फिट मार्गावर असणाऱ्या सात मजली शमा इमारतीला रविवारी (दि. १२) सकाळी भीषण आग लागली. या आगीत सहा जण जखमी झाले असून त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले.

### यवतमाळमध्ये जवानाची हत्या

**यवतमाळ :** येथील पांढरकवडा मार्गावर गृहरक्षक दलातील जवानाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. ही घटना शनिवारी (दि. ११) रात्री ११च्या सुमारास एका कार वॉशिंग सेंटरमध्ये घडली. अक्षय सतीश कैथवास (३१, रा. भोसा रोड, यवतमाळ) असे मृत जवानाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. सावकारी वादातून सुपारी देऊन ही हत्या करण्यात आल्याची चर्चा आहे.

### ऑस्ट्रेलिया 'डब्ल्यूटीसी' चॅम्पियन

**लंडन** : जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने विजय साकारत चषक जिंकला. ऑस्ट्रेलियाने भारताचा २०९ धावांनी पराभव केला. **(सविस्तर वृत्त पान ८ वर..)**

# भारतीय महिला हॉकी संघाने रचला इतिहास

## ज्युनिअर आशिया चषक स्पर्धेचे प्रथमच विजेतेपद



**इस्तंबूल : वृत्तसंस्था**
भारताच्या ज्युनिअर महिला हॉकी संघाने इतिहास रचला आहे. या संघाने ज्युनियर महिला आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले आहे. भारताने प्रथमच या स्पर्धेवर नाव कोरले आहे.

अंतिम फेरीत टीम इंडियासमोर दक्षिण कोरियाचे आव्हान होते. भारताने स्पर्धेच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी संघ असलेल्या दक्षिण कोरियाचा २-१ असा पराभव केला. दक्षिण कोरियाने सर्वाधिक चार वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. ही स्पर्धा २०२१मध्येच होणार होती, पण कोरोनामुळे ती दोन वर्षांच्या विलंबाने खेळवली गेली.

हॉकी इंडियाने घोषित केले की, खेळाडूंना प्रत्येकी दोन लाख रुपयांचे रोख पारितोषिक मिळेल तसेच सहाय्यक कर्मचाऱ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे रोख बक्षीस मिळेल.

भारतीय संघाने सेमीफायनलमध्ये यजमान जपानचा पराभव करीत थेट आशिया चषक फायनलमध्ये धडक मारली होती. टीम इंडियाने जपानचा १-० असा पराभव केला. ही स्पर्धा २९ सप्टेंबर ते १० डिसेंबरदरम्यान चिलीमध्ये होणार आहे.

# पुण्यात राष्ट्रीय आमदार संमेलन

**मुंबई : प्रतिनिधी**
एमआयटी स्कूल ऑफ गर्व्हमेंटतर्फे १५ ते १७ जून या कालावधीत मुंबईतील बीकेसी जिओ सेंटर येथे पहिल्यांदाच राष्ट्रीय आमदार संमेलन आयोजित करण्यात आले आहे. देशभरातील विधानसभा, विधान परिषदेचे अध्यक्ष, सभापती यांच्या सहकार्याने होणाऱ्या या संमेलनात विविध राज्यांतील सुमारे दोन हजार ५०० आमदार सहभागी होण्याचा अंदाज आहे.

आमदार माधुरी मिसाळ, संमेलनाचे प्रमुख संयोजक समन्वयक राहुल कराड यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संयोजन समितीचे सदस्य योगेश पाटील, डॉ. मिलिंद पांडे, डॉ. दत्ता दांडगे या वेळी उपस्थित होते. राष्ट्रनिर्माण, राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय सर्वांगीण शाश्वत विकास या मध्यवर्ती त्रिसूत्रीवर होणाऱ्या या संमेलनात विविध सत्रे होणार आहेत.

# माऊलींच्या पालखीचे पंढरपूरसाठी प्रस्थान



**आळंदी** : आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीने रविवारी (दि. ११) पंढरपूरसाठी प्रस्थान केले. हा नयनरम्य आणि भव्य सोहळा अनुभवण्यासाठी वारकऱ्यांप्रमाणेच नागरिकांचीही गर्दी जमली होती. पहाटेपासूनच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा प्रस्थान सोहळा सुरू झाला. मुख्य मंदिर आकर्षक फुलांनी सजवण्यात आले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले होते. पवित्र इंद्रायणी नदीत स्नान करून वारकरी माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यात सहभागी झाले. ग्यानबा-तुकारामाच्या जयघोषाने अवघी आळंदी दुमदुमून गेली होती. टाळ-मृदंगाच्या गजरात माऊलींच्या पालखीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. माऊलींची पालखी श्री क्षेत्र आळंदीमधील गांधीवाडा येथील आजोळघरी मुक्कामी असेल. त्यानंतर पुढील प्रवास सुरू होईल.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच मदत

## प्रशासकीय कार्यवाहीला आला वेग



**कळंब : प्रतिनिधी**

खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सोमोरे जावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कमीत कमी तीन हेक्टरपर्यंत हेक्टरी १३ हजार ६०० रुपयाची थेट मदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने घेतला होता. यानुसार तालुक्यातील इटकूर, गोविंदपूर, शिराढोण, कळंब महसूल मंडळातील ४६ हजार शेतकऱ्यांना तब्बल ५४ कोटी रुपयांची मदत लवकरच वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी तलाठी यांच्याकडून शेतकऱ्यांचे आधारकार्ड, बँक पासबुक झेरॉक्स जमा करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

तालुक्यातील ९८ हजार हेक्टर लागवडी खालील क्षेत्रापैकी तब्बल ७८ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीपांची विविध पिके घेतली जातात. यामुळेच खरीप हंगाम हा तालुक्यातील प्रमुख पीक हंगाम म्हणून ओळखला जातो. या हंगामातील सोयाबीन, तूर, कापूस आदी १३ पिके ही पूर्णपणे मोसमी पावसावर अवलंबून आहेत, परंतु गत पावसाळ्यात जोमात बरसलेल्या वरुणराजाने खरीपातील पिके मातीमोल केली.

तालुक्यातील चार महसूल मंडळात अतिपाऊस झाल्याने खरिपातील सर्व पिकाचे प्रचंड असे नुकसान झाले. चार महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे जवळपास प्राथमिक अंदाजानुसार ६० कोटींपेक्षा जास्त रुपयाचे न भरून येणारे नुकसान झाले.

अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. यापूर्वी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या पिकांस प्रति हेक्टर सहा हजार ८०० रुपये आर्थिक मदत करण्याचे निकष होते.

यात मुख्यमंत्री शिंदे-उपमुख्यमंत्री फडणवीस सरकारने बदल करत कमीत कमी तीन हेक्टर पर्यंत हेक्टरी १३ हजार ६०० रुपयाची मदत शेतकऱ्यांना करण्याचा निर्णय घेतला आहे. फळपीकांसाठीही अनुदानाची मर्यादा वाढविण्यात आली आहे.



### बँक डिटेल्स घेण्याचे काम सुरु

यात आधारकार्ड, बँक पासबूक झेरॉक्स संकलित करण्याचे काम तलाठ्यांमार्फत सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच शेतकऱ्यांनी दिलेल्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम वर्ग करण्यात येणार आहे. इटकूर, गोविंदपूर, शिराढोण, कळंब महसूल मंडळातील सर्व गावातील ४६ हजार शेतकऱ्यांना आर्थिक मदत वाटप करण्यात येणार आहे. यासाठी तहसील कार्यालयाने शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी ५४ कोटी रुपयाची शासनाकडे मागणी केली होती.

# ‘माथेरानच्या राणी’मुळे एक कोटींचा महसूल




**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानची राणी म्हणून ओळख असलेल्या मिनी टॉय ट्रेनला पर्यटकांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून मार्च ते मे २०२३ या तीन महिन्यात १.३१ लाख प्रवाशांनी प्रवास केला असून १.०१ कोटींचा महसूल मध्यरेल्वेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

मुंबई, पुणे आणि परिसरातील नागरिकांसाठी माथेरान हे जवळचे आणि लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत परिवारासह पर्यटकांनी माथेरानला भेट दिली. याठिकाणी मध्यरेल्वेची १०० वर्षांहून अधिक जुनी नेरळ-माथेरान मिनी टॉय ट्रेन आहे. जी भारतातील काही पर्वतीय रेल्वेपैकी एक आहे. या ट्रेनमधून सफर करण्यासाठी पर्यटकांची गर्दी होते. या उन्हाळ्यात मार्च ते मे २०२३ या तीन महिन्यांत अमन लॉज ते माथेरान दरम्यानच्या शटल सेवेसह एकूण १,३१,४८१ प्रवाशांना माथेरानला नेण्यात आले आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीच्या तुलनेत प्रवासी संख्या १६.९७ टक्के अधिक असून गेल्यावर्षी १,१२,४०१ प्रवाशांनी प्रवास केला. मार्च ते मे २०२३ या तीन महिन्यांच्या कालावधीत एकूण १,०१,२८,४२४ रुपयांचा महसूल मिळाला तर मार्च ते मे २०२२ या कालावधी ७२,८७,६८० रुपयांचा महसूल मिळाला आहे. महसुलात या दोन वर्षांच्या तुलनेत ३९.९८ टक्क्यांचीची वाढ झाली आहे.

# नवी मुंबईत दूषित पाणीपुरवठा; नागरिक हैराण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत रविवारी (दि. ११)दिवसभर दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. या घटनेने नवी मुंबईत सर्वत्र नाराजी व्यक्त होत असून पालिकेच्या अनियोजित कारभारावर नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

शुक्रवारी कमी दाबाने पाणीपुरवठा करणार असल्याचे आवाहन पालिकेने केले होते, तर शनिवार व रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात आला, मात्र एकदम लालसर, गढूळ अस्वच्छ पाणी आल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**एकीकडे पालिकेकडून सातत्याने जलवाहिनेच्या सुधारणेसाठी शटडाऊन घेतला जात आहे, तर दुसरीकडे दुरुस्ती झाल्यावर गढूळ पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत पालिकेकडून स्वतः पुढाकार घेऊन पत्रक काढून नागरिकांना पाणी उकळून पिण्याचे आवाहन करणे याबाबत सावध करणे आवश्यक होते, मात्र तेदेखील पालिका करताना दिसत नाही. -रुपाली कानडे, नागरिक, नेरुळ**

नवी मुंबई शहरातील नागरिकांना मोरबे धरणातून पाणीपुरवठा होत असतो. याठिकाणी जलशुद्धीकरण केंद्र तसेच शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा होण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. तरीही शहरात सातत्याने अस्वच्छ पाणीपुरवठा होतच असतो. बुधवारी शहरात शटडाऊनमुळे पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे गुरुवारी कमी दाबाने पाणी आले, परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा शुक्रवारी आदई गावाजवळ मुख्य जलवाहिनी फुटल्याने तातडीने काम करण्यासाठी सायंकाळी शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता.

शनिवारी सकाळी नळाला एकदम लालसर मातीचे पाणी आल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त करीत अस्वच्छ पाणीपुरवठा का करता? असा प्रश्न उपस्थित केला आहे. रविवारी देखील हेच रडगाणे सुरू असल्याने पालिकेच्या कर्भारा विरोधात प्रश्नचिन्ह व्यक्त होत आहे.


# श्रीनगर येथे महाराष्ट्र भवनासाठी जागा देण्याची मुख्यमंत्री शिंदे यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीनगर येथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी जागा देण्याची मागणी रविवारी (दि. ११) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जम्मू आणि काश्मीरचे गव्हर्नर मनोज सिन्हा यांना प्रत्यक्ष भेटून केली. सध्या मुख्यमंत्री काश्मीर दौऱ्यावर असून ते येथे असून या वेळी त्यांनी मनोज सिन्हा यांची भेट घेतली.

या वेळी त्यांना दिलेल्या पत्रात मुख्यमंत्री म्हणतात की, पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढविणे आणि पर्यायाने आर्थिक विकास करणे यासाठी महाराष्ट्र भवनाला जागा मिळाल्यास दोन्ही राज्यांना त्याचा फायदा होईल. श्रीनगर मधील हे महाराष्ट्र भवन केवळ पर्यटकांना निवासाची सुविधा उपलब्ध करून देणारे राहणार नाही तर या ठिकाणी महाराष्ट्राची समृद्ध कला, खाद्य आणि संस्कृतीची झलक देखील पाहता येऊ शकेल.

जम्मू आणि कश्मीर समवेत नाते अधिक दृढ करण्यासाठी या महाराष्ट्र भवनाचा उपयोग विद्यार्थी, उद्योजक, वरिष्ठ अधिकारी यांना एक प्रमुख केंद्र म्हणून करता येईल. महाराष्ट्र भवनसाठी योग्य ती जागा मिळाल्यास कश्मीरची संस्कृती, पर्यावरण लक्षात घेऊन एक चांगले भवन या ठिकाणी राज्य सरकारतर्फे बांधण्याची ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी या पत्रात केली आहे.





खोपोली : भाजप खोपोली शहर शाखेतर्फे क्रांतीनगर भागात लाभार्थींना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले. या वेळी केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहितीही देण्यात आली. या कार्यक्रमाला शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस हेमंत नांदे, जिल्हा कामगार आघाडी संयोजक सूर्यकांत देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## औरंगजेबाचे स्टेटस; वाशीत गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील मोहम्मद अली मोहम्मद हुसेन या युवकाने व्हॉट्सअॅप स्टेटसवर औरंगजेबाचे छायाचित्र ठेवल्याने एकच खळबळ उडाली. हा प्रकार उघड करीत सकल हिंदू समाजाने अक्रमक भूमिका घेत पोलीस ठाणे गाठले तसेच या तरुणाविरोधात तक्रार दाखल केली. वाशी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

नवी मुंबईच्या वाशी सेक्टर १७ येथील जिओ गॅलरीमध्ये काम करणारा मोहम्मद अली मोहम्मद हुसेन (रा. मुंबई) याने व्हॉट्सअॅप स्टेटसवर औरंगजेबाचे स्टेटस ठेवून हिंदूंच्या धार्मिक भावना भडकावण्याचा व औरंगजेबाच्या उद्दातीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्याचे हे स्टेटस नवी मुंबईत व्हायरल होताच नवी मुंबईतील सकल हिंदू समाजाने वाशी पोलीस ठाणे येथे धाव घेत आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची व आरोपीला अटक करण्याची मागणी केली. त्यानंतर पोलीस प्रशासनाने त्या माथेफिरूवर गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्रात वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न असे काही समाजकंटक करीत आहेत. या माथेफिरुला अटक करावी तसेच पोलिसांनी अशा समाजकंटकांवर नजर ठेवून त्यांच्यावर कारवाई करावी; अन्यथा सकल हिंदू समाजाच्या वतीने आक्रोश आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या वेळी देण्यात आला.

### दुखवटा

## हभप दत्ताराम खंडागळे यांचे निधन

**कर्जत** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्जत येथील सर्वात ज्येष्ठ कार्यकर्ते हभप दत्ताराम पंढरीनाथ खंडागळे (वय ९६) यांचे शनिवारी (दि.१०) संध्याकाळी निधन झाले.



एक अतिशय शिस्तप्रिय, संयमी, तत्त्वचिंतक आणि अजातशत्रू असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ला नागपूर येथे झाल्यानंतर कर्जत येथे सुरू झालेल्या पहिल्या शाखेचे ते संस्थापक सदस्य होते. प्रातःकालीन शाखेची जबाबदारी त्यांनी कित्येक वर्षे समर्थपणे सांभाळली. राष्ट्रीय एकता, एकात्मता व अखंडता तसेच सामाजिक एकोपा टिकविण्यासाठी त्यांनी भरीव कार्य केले. वारकरी संप्रदायाचे ते आयुष्यभर भक्त होते. हरिपाठ सप्ताहाला त्यांनी चालना दिली. लोहार समाजाचे ते पहिले पदवीधर होते. किल्लारी भूकंपात त्यांनी स्वयंसेवी म्हणून केलेले कार्य वाखाणण्याजोगे होते. त्यांच्या पश्चात कन्या कवयित्री प्रेमा दळवी, नातवंडे व मोठा आप्त परिवार आहे. आमराईच्या स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पान १ वरून

## उरणमध्ये विविध पक्षांचे सरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश

आमदार महेश बालदी म्हणाले की, कार्यकर्त्यांच्या विश्वासामुळे आणि मी केलेल्या विकासकामांच्या जोरावर या मतदारसंघातून पुन्हा निवडून येणार आहे. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी माजी आमदार मनोहर भोईर यांच्या गावात जे वक्तव्य केले ते खोडसाळ होते. महाविकास आघाडीने वाटोळे केले. त्यामुळे २०२४मध्ये जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप निवडून येणार आहे.

या वेळी इंद्रायणी सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. सुरेश राऊत यांचे सुपुत्र तथा कळंबुसरे गावचे माजी सरपंच सुशिल राऊत व सहकारी, धुतूम गावचे माजी सरपंच तथा शेकापचे ज्येष्ठ नेते धनाजी ठाकूर, अॅड. किशोर ठाकूर व इतर, नांदगावच्या सरपंच विजेता मनोहर भोईर, माजी सरपंच मनोहर भोईर व अन्य, खालापूर पंचायत समिती सदस्य कमळा भस्मा, दिघोडे, बोकडविरा गावातील कार्यकर्ते तसेच आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

दरम्यान, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी लोकसभा निवडणुकीसाठी मावळ मतदारसंघ प्रमुख म्हणून, तर पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची उरण विधानसभा मतदारसंघ प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

## ऑनलाईन धर्मांतरप्रकरणी आरोपीला अलिबागेतून अटक

या प्रकरणाच्या तपासात उत्तर प्रदेश पोलिसांनी गाझियाबाद येथून अब्दुल रहमान उर्फ नन्नी पुत्र महमूद अन्सारी या आरोपीला अटक केली. या आरोपीने मुंब्रा भागात शाहनवाज मकसूद खान हा बनावट युजर आयडी बनवून त्याच्या माध्यमातून तो गेम खेळण्यासाठी उपलब्ध करून देत होता. या गेममध्ये हरलेल्या हिंदू मुलांना तो कलमा वाचायला सांगून इस्लाम कबूल करण्यास भाग पडत होता. त्यांना कलमा वाचल्यानंतर तुम्ही कधीही गेम हरणार नसल्याचे आमिष दाखवत होता.

# तब्बल महिनाभर धोकवडे ग्रामस्थांच्या तोंडचे पाणी पळाले

**अलिबाग : प्रतिनिधी**

हवामान बदलामुळे पावसाची शाश्वती देता येत नाही. ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू आहे. अशातच अलिबाग तालुक्यातील धोकवडे गावात जवळपास महिनाभर नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. एकीकडे उन्हाच्या झळा कमी होण्याची चिन्हे दिसत नसताना भर उन्हाळ्यात जवळपास महिना उलटून देखील नळांना पिण्याचे पाणी येत नसल्याने धोकवडे गावातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत.

ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे पाण्याच्या समस्येबाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तरेही मिळत नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थ करीत आहेत, तसेच जलजीवन मिशन योजनेचे कामही निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप गफमस्थांकडून केला जात आहे. धोकवडे गावच्या पाणीप्रश्नी उपाययोजना करण्याबाबत ग्रामस्थ ग्रामपंचायतीकडे दररोज पाठपुरावा करीत आहेत. याबाबत धोकवडे गावचे सुपुत्र तथा महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमाचे संगीतकार अमीर हडकर हे धोकवडे गावी आले असता त्यांनाही पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागले. अखेर त्यांनी याबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात ग्रामपंचायतीला निवेदनही दिले आहे.

गावातील ज्या भागात एक नळकोंडाळे होते त्या भागात ग्रामस्थांच्या विनंतीवरून आणखी एक नवीन नळकोंडाळे उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे नळावरची गर्दी कमी झाली, परंतु ग्रामस्थांचा हा आनंद काही काळच राहिला. पुढे काही दिवसात दोन्ही नळांचे पाणी कमी झाले पुढे तर ते बंदच झाले. आता तर ग्रामस्थांना नळाला येणाऱ्या पाण्याची चातकासारखी वाट पहावी लागते.

### पाण्यासाठी वणवण; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष



२०२३सालामध्ये जिथे आपले देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील जलजीवन मिशन योजनेंतर्गत १० कोटी गावातील घरांना पाणी दिले आहे, परंतु पर्यटनाच्या व नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या अलिबाग तालुक्यातील धोकवडेमध्ये १५-१५ दिवस पाणी येत नाही याबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

ग्रामपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा केला तरी अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. चातकाहूनही अधिक तीव्रतेने ग्रामस्थ पाण्याची डोळ्यात प्राण आणून वाट पाहत आहेत. पिण्याबरोबरच वापरासाठीचे पाणीदेखील विकत घ्यावे लागत आहे. ज्यांना पाणी परवडत नाही असे ग्रामस्थ दूरवरून डोक्यावर किंवा सायकलच्या सहाय्याने पिण्यापुरते पाणी आजूबाजूच्या गावातून किंवा दूरच्या पाणवठ्यावरून आणतात. या समस्येचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर पाणीप्रश्नी योग्य उपाययोजना करावी अशी विनंती ग्रामस्थांनी रायगड जिल्हा परिषदेकडे केली आहे.

**मी शूटिंगला विराम मिळाल्यानंतर धोकवडे या माझ्या गावी आराम करण्यासाठी आलो, परंतु इथे आल्यावर लक्षात आले की, गावात गेले अनेक दिवस पाणी येत नाही. आज जवळपास महिना झाला तरीही गावात पाणी नाही. ग्रामपंचायतीमध्ये गेलो असता कर्मचारी फक्त एवढेच सांगतात की, वरून पाणी मिळत नाही. संबंधित वरीष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या समस्येचा गांभीर्याने विचार करून पाणीप्रश्न मार्गी लावावा.**

**-अमीर हडकर, संगीतकार**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **सैफुल्ला अब्दुल्ला खान, रा. दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड.** याजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड.**

| सर्व्हे नं./ भूमापन क्र. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ३७ | अ/२/१६ | ०-११-९० पो.ख. ०-०१-८० | ०.८७ |
| ३७ | अ/२/४ | ०-६२-८० पो.ख. ०-०९-०० | ४.६३ |
| ३७ | अ/२/६ | ०-१६-७० पो.ख. ०-०२-३० | १.२५ |
| ३७ | अ/२/९ | ०-२४-८० पो.ख. ०-०३-५० | १.८१ |
| ४५ | ७ | ०-२८-३० पो.ख. ०-१०-६० | ३.१३ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक : १२/०६/२०२३

**सही/**
**निलेश द. हातमोडे**
**अॅडव्होकेट**

पत्ता :- पत्ता- शॉप न. १३०, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल,ता.पनवेल,जि. रायगड

## निवडक

### रोजगार मेळाव्याला प्रतिसाद




**पनवेल** : आयटीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स यांच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्याला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. ८ ते ९ जूनदरम्यान झालेल्या रोजगार मेळाव्याला आरोग्य क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवला. या वेळी काही विद्यार्थ्यांना या कंपन्यांच्या माध्यमातून नोकरीची संधीदेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आयटीएममध्ये पार पडलेल्या रोजगार मेळाव्यात टायटन आय प्लस, गंगर नेशन, समीर पर्फेक्ट व्हिजन, एसआरएल डायग्नोस्टिक, मेडीलॅब, कृष्णा डायग्नोस्टिक, क्लीन्टेज लॅब आदी आरोग्य क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी यामध्ये सहभाग घेतला असल्याची माहिती आयटीएमच्या डॉ. ईरिना राणा यांनी दिली. आयटीएमच्या विद्यार्थ्यांनी या रोजगार मेळाव्यात शेकडोंच्या संख्येने सहभाग घेतला.

### चार्जिंगला लावलेला मोबाइल पळविला

**पनवेल** : रेल्वे स्टेशनमधील प्रतीक्षा कक्षात चार्जिंगला लावलेला मोबाइल चोरट्यांनी पळवल्याची घटना घडली आहे. पनवेलमधील आशिष रसाळ हा तरुण पुणे येथे जात होता. प्रगती एक्स्प्रेस गाडी येण्यासाठी वेळ असल्यामुळे तो रेल्वेच्या प्रतीक्षा कक्षात बसला होता. तेथे चार्जिंगला लावलेला मोबाईल चोरट्यांनी पळवून नेला. याविषयी पनवेल रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

### अत्याचार करणारा आरोपी गजाआड

**पनवेल** : घरात आश्रय देऊन अत्याचार केल्याप्रकरणी खारघर पोलिसांनी खारघर येथील ३७ वर्षीय अन्वर बिस्मिला शेख याला अटक केली आहे. अन्वर त्याच्या कुटुंबासोबत खारघर गावातील हनुमान मंदिराजवळ राहत होता. अन्वरने पीडितेच्या असहायतेचा फायदा उचलून केलेल्या कृत्यामुळे खारघरमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांनी अन्वरला बलात्कारप्रकरणी अटक करून त्याची रवानगी पोलीस कोठडीत केली. तीन दिवसांपूर्वी ३० वर्षीय पीडिता खारघर वसाहतीमध्ये नोकरीसाठी अन्वरला भेटली. त्या पीडितेला काम आणि भाड्याने घर मिळवून देतो, असे आश्वासन देऊन तिला स्वतःच्या घरी अन्वरने आणले. संबंधित आरोपीने या पीडित बाबत स्वतःच्या पत्नीला घर मिळेपर्यंत ती घरातच राहील असे सांगून पीडितेला आश्रय दिला, मात्र मध्यरात्री कुटुंबातील झोपल्यावर पीडितेवर अत्याचार केल्याचे पीडितेने पोलिसांना सांगून अन्वरविरोधात गुन्हा दाखल केला.

# विद्यार्थ्यांचे ओझे होणार कमी!

- पुस्तकांमध्येच वह्यांची पाने
- पालकांनाही दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी एकात्मिक आणि द्विभाषिक पुस्तकांमध्ये बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वापराव्या लागणाऱ्या वह्यांचे ओझे कमी होणार असून पुस्तकांमध्येच वह्यांची पाने जोडली गेल्याने शाळेत वही नेण्याची गरज भासणार नाही. यामुळे पाठीवरील ओझे कमी होऊन विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

स्पर्धात्मक युगामुळे शालेय अभ्यासक्रमात वारंवार बदल होत आहेत. याशिवाय शाळांमध्ये दररोज विविध उपक्रम राबवले जातात. त्यामुळे पाठ्यपुस्तकांसोबत इतर अभ्यासक्रमांची पुस्तके, वह्या, कंपासपेटी, जेवणाचा डबा व पाण्याची बाटली या वस्तूंमुळे विद्यार्थ्यांचे दप्तर भरलेले असते. या दप्तरामुळे अनेकांना पाठ तसेच मानदुखीसारखे गंभीर आजार लहानपणीच बळावत आहेत. याबाबतची माहिती एका सर्वेक्षणातून समोर आल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी राज्य शासनाने नवा आदेश काढला आहे. त्यानुसार पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाकडून देण्यात येणाऱ्या पुस्तकातील धड्यातील मजकुरानुसार दोन ते चार पाने जोडली आहेत. त्यामुळे शाळेत स्वतंत्र वही नेण्याची गरज नसल्यामुळे पाठीवरील ओझे कमी होणार आहे.



### शिक्षण विभागाचे आवाहन

**शिक्षकांनी पुस्तकातील विषयावर दिलेली टिपणे विद्यार्थ्यांनी या पानांवर लिहावीत. आठवीपर्यंतच्या पाठ्यपुस्तकांतील कविता, धडा, घटक यानंतर विद्यार्थ्यांना नोंदी करता याव्यात, त्यासाठी पुस्तकांना वह्यांची पाने जोडली आहेत. माझी नोंद या सदराखाली विद्यार्थी, शिक्षक शिकवत असताना किंवा पाठ समजून घेताना या वह्यांच्या जोडलेल्या पानांवर लिहून घ्यावे. शब्दार्थ, महत्त्वाची सूत्रे, महत्त्वाचे संबोधन, महत्त्वाची वाक्य या पानांवर नोंद करून विद्यार्थ्यांनी ठेवावी.**

**विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी पाठ्यपुस्तकांतच वह्यांची पाने समाविष्ट केली आहेत. विद्यार्थ्यांनी शिक्षक पाठ शिकवताना त्याचे टिपण त्या कागदावर करायचे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत वह्या घेऊन येण्याची गरज नाही.**

**–सीताराम मोहिते, गटशिक्षणाधिकारी, पनवेल**



# विचुंबे भुयारी मार्ग आजपासून बंद

## पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

तक्का गावाकडून विचुंबेकडे जाणारा भुयारी मार्ग रेल्वेच्या दुसर्या मार्गिकेच्या कामासाठी सोमवार (दि. १२)पासून वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. त्यामुळे वहान चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन वाहतूक पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा यांनी केले आहे.

जेएनपीटी ते वैतरणा सेक्शन फेज-२ या डबल लाईन रेल्वे मार्गाचे काम पनवेल रेल्वे स्टेशन तक्का ते विचुंबे गाव या मार्गावर सुरू राहणार असल्याने तक्का गाव ते विचुंबेकडे जाणारा भुयारी मार्ग, विचुंबे गाव, नवीन पनवेल ते शिवशंभो नाका मार्ग दोन्ही बाजूच्या वाहतुकीस तीन महिने पूर्ण पणे बंद राहणार आहे. त्याबाबत



अधिसूचना वाहतूक पोलीस उपायुक्तांनी काढली आहे. या काळात वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पर्यायी मार्ग

**विचुंबेकडून तक्का गाव-विचुंबे-नवीन पनवेल रेल्वे स्टेशन- फायर ब्रिगेड- एचडीएफसी सर्कल- नवीन पनवेल सिग्नलमार्गे तक्का गाव, शिवशंभो नाकाकडून विचुंबे- पनवेल रेल्वे स्टेशन- डॉ. आंबेडकर पुतळा- एसटी स्टँड- नवीन पनवेल सिग्नल- एचडीएफसी सर्कल -फायर ब्रिगेड- नवीन पनवेल रेल्वे स्टेशन या मार्गे जातील.**

# वरुणराजासाठी बळीराजाचे साकडे

**पनवेल : वार्ताहर**

उन्हाचा दाह वाढत चालला असून अधून मधून ढगाळ वातावरण शेतकऱ्यास लवकर पाऊस येण्याचे संकेत देत आहे. याचीच प्रचिती म्हणून नुकतेच तुरळक पावसाचे आगमन झाले. यामुळे पावसाचे लवकर आगमन होण्यासाठी वरुण राजाकडे बळीराजास साकडे घालीत आहेत कारण अशा ढगाळ वातावरणामुळे पावसाचे आगमन लवकर होणार असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

दरवर्षी शेतकरी शेती करीत करीत असल्यामुळे पावसाच्या आगमनाचे काही काही हालचाली शेतकरी जाणत असतो. मागील वर्षी अशा वातावरणात कधी पाऊस तर कधी ऊन पडत असल्याने चालू वर्षी मात्र शेतकऱ्यांना मोठ्या पावसाच्या आशा लागली असून काही शेतकरी ढगाळ वातावरणामुळे शेतीच्या कामात मग्न झाल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे. चालू वर्षी तरी पावसाने चांगली साथ द्यावी, असे साकडे शेतकरी वरूण राजाकडे करीत आहे. ढगाळ वातावरणामुळे आकाशात पावसाचे वातावरण निर्माण झाल्याने शेतकर्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे, मात्र पावसाचे आगमन मोठ्या प्रमाणावर होत नसल्यामुळे शेतकरी चिंता ग्रस्त झाले आहे.

आकाशात ढग निर्माण होत असले तरीसुद्धा सर्वच ठिकाणी पाऊस पडतच असतो असे नाही. उन्हामुळे शेतामध्ये असलेले पाणी निघून जात असल्यामुळे दुबारा पेरणीचे सावट निर्माण होऊ नये, यासाठी शेतकरी त्या वरुणराजाकडे प्रार्थना करीत आहे.

# ज्योत्स्ना ठाकूर यांना सप्तज्योती नारीशक्ती पुरस्कार

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मधील उपक्रमशील शिक्षिका आणि रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना सुधीर ठाकूर यांना गव्हाण येथील पत्रकार उत्कर्ष समितीच्या वतीने दिला जाणारा सप्तज्योती नारीशक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पत्रकार उत्कर्ष समिती अंतर्गत स्थापित महिला संघर्ष समितीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये आयोजित समारंभात ज्योत्स्ना सुधीर ठाकूर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

म्हाडाचे अध्यक्ष आणि भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीसह पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, सचिव वैभव पाटील, नीता माळी, दिव्या लोकरे, महिला उत्कर्ष समिती अध्यक्ष स्मिता पाटील, संदिप मुळीक, समाजसेविका विनायकी पाटील आदींच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.

त्याचप्रमाणे श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या उपक्रमशील शिक्षिका ज्योत्स्ना ठाकूर व त्याच शाळेत शिकलेली विद्यार्थ्यीनी आणि सुप्रसिद्ध गायिका सूर नवा ध्यास नवा फेम श्वेता सुरेश ठाकूर हिलासुद्धा संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सप्तज्योती नारीशक्ती पुरस्काराने गौरविण्यात आले.

ज्योत्स्ना ठाकूर व श्वेता ठाकूर या गुरू-शिष्येला एकाच मंचावर समान पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

## सुयश क्लासेसतर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील आवरे येथील सुयश क्लासेसतर्फे साई प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले होते. या लीगमधून मिळालेल्या निधीतून गावातील विद्यार्थ्यांना सहा डझन वह्यांचे वाटप करण्यात आले.

सुयश क्लासेस हा तालुक्यातील प्रख्यात असा क्लास असून या क्लासेसच्या माध्यमातून दरवर्षी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्याचे वाटप करून क्लासेसमार्फत दरवर्षी शैक्षणिक सहलदेखील काढण्यात येते.

वह्यावाटप कार्यक्रमाला सुयश क्लासेसचे संस्थापक अध्यक्ष निवास गावंड, प्रीमियर लीगचे प्रतिनिधी प्रतीक गावंड, प्रज्वल गावंड, सुयश क्लासेसचे शुभचिंतक तथा क्रिकेटपटू विराट कोहलीचे फॅन शंकर पाटील, कोरोना योद्धा नरेश गावंड आदी उपस्थित होते.



# भाजप ओबीसी सेल उरण तालुका अध्यक्षपदी दीपक पाटील

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील कळंबुसरे गावचे रहिवाशी सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून दीपक पाटील सर्वांना सुपरिचित आहेत. टाऊनशिप मल्टीपर्पज हॉल येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्याच्या वेळी भाजपतर्फे दिपक पाटील यांची नियुक्ती ओबीसी सेल उरण तालुकाध्यक्षपदी करण्यात आली आहे.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या हस्ते त्यांना हे अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवि भोईर, कुलदिप नाईक, उरण पूर्व विभाग सरचिटणीस रुपेश पाटील, कळंबूसरे गाव अध्यक्ष राजेश पाटील, सदस्य मयूर गायकवाड आदी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षाचे निष्ठावंत, दांडगा जनसंपर्क असलेले दिपक




पाटील (कळंबुसरे )यांची भाजप ओबीसी सेलच्या उरण तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

माझ्यावर दिलेली जबाबदारी मी एकनिष्टेने, प्रामाणिकपणे पार पाडेन. पक्षाचा तळागाळात प्रचार व प्रसार करेन अशा भावना व्यक्त करीत दिपक पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी व सर्व भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते यांचे आभार मानले आहेत.



**पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ज्येष्ठ नेते आप्पा भागीत यांना वाढदिवसानिमित्त रविवारी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील उपस्थित होते.**



**उलवे नोड : आमदार महेश बालदी यांचे मार्गदर्शनाखाली भाजपतर्फे उरण-पनवेल मतदारसंघातील नागरिकांसाठी सेक्टर ३ येथे मतदर नोंदणी कॅम्प घेण्यात आला. कॅम्पला वहाळ ग्रमापंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, बंगाली वेल्फेअर ट्रस्टचे तपस मित्रा, देबराज मजुमदार, लोनाथ रूद्रा, उदय चॅटर्जी, धनंजय भट्टाचार्य, संजित पाल, सुजित दास, शुजित रॉय आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

# खाडीवरची माडी कादंबरीवर पनवेलमध्ये चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलच्या के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयात लेखक गज आनन म्हात्रे यांच्या खाडीवरची माडी कादंबरीवर आयोजित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्राचे उद्घाटन कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख प्रा. एल. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. या चर्चासत्रात प्रमुख वक्ते ॲड. साहित्यिका सुनिता जोशी, साहित्यिक डॉ. अविनाश पाटील, व्याख्याते योगेशचंद्र लोहकरे, लेखक घनश्याम परकाले, लेखक-पत्रकार सुधाकर लाड, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी सहभाग घेतला.

खाडीवरची माडी या कादंबरीचे लेखक गज आनन म्हात्रे यांनी, प्रेमात पडलो असतो तर काय घडले असते? याचे वास्तव चित्र माडीवरची खाडी या कादंबरीतील रेखाटलेले आहे. कथा घडली नाही घडावी असे वाटत होते. पुस्तकात सुखाचे शब्द टिपले आहेत. कादंबरीमध्ये शोकांतिकाऐवजी सुखांतिका अशा स्वरूपात ही कादंबरी असल्याचे त्यांनी सांगितले.

व्याख्याते योगेशचंद्र लोहकरे यांनी चर्चासत्रात पुस्तकाविषयी विस्तृत चर्चा केली त्यांनी, कुठल्याही लेखकाचे पुस्तक हे त्याचे आत्मचरित्रच असते. खाडीवरची माडी या पुस्तकात आत्मभान, आत्मजाणीव, आत्मविष्कार लेखकाचा प्रकट झालेला दिसतो. कथा असेल किंवा कुठलेही पुस्तक हे सामाजिक इतिहास, सामाजिक दस्तऐवज असते.लेखकाचे विचार पुस्तकात डोकावत असतात. पुस्तकामधून लेखकाची गतकातर्ता दिसते असे सांगितले. साहित्यिक डॉ. अविनाश पाटील यांनी, खाडीवरची माडी या नावावरून एक कादंबरी रहस्यमय असावी असे वाटते पण ही कादंबरी प्रेम कथा आहे, प्रेमाची संघर्ष कथा आहे असे त्यांनी सांगितले.

साहित्यिका ॲड. सुनिता जोशी यांनी, कुठल्याही साहित्यिकाची सुरुवात कवीपासून होते. लेखक गजानन म्हात्रे यांनी या वयातही प्रेम कथा कादंबरी लिहिली हे त्यांचे धाडसच म्हणावे लागेल. सफल प्रेम कथा असलेली ही कादंबरी असल्याचे त्यांनी सांगितले. लेखक सुधाकर लाड यांनी, खाडीवरची माडी या पुस्तकातून आगरी-कोळी समाजाचे दर्शन होते. लेखक घनश्याम परकाले यांनी, पुस्तकातील भाषा मनाला भिडणारी असून समाज, निसर्ग मानवी जीवनाचे दर्शन या कादंबरीतून होत असल्याचे सांगितले. प्रा. एल. बी. पाटील यांनी, नुकताच प्रकाशन झालेली खाडीवरची माडी या कादंबरीवर चर्चासत्र आयोजित करणे हे लेखकासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी प्रास्ताविक व उपस्थितांचे आभार मानले.

## संपादकीय

# मान्सूनची दस्तक

दरवर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वर्दी देणाऱ्या वरुणराजाचे आगमन यंदा लांबले. तसे पाहिले तर हल्ली वर्षभर कुठे ना कुठे पाऊस पडत असतो. त्यामुळे त्याचे औत्सुक उरले नसले तरी पावसाळ्यातील त्याचे बरसणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यातच या वर्षी उष्मा प्रचंड असल्याने बळीराजासह सर्वांनाच मोसमी पावसाचे वेध लागले...

**मे महिना संपून जून महिना सुरू झाला की पावसाळ्याचे वेध लागतात. वर्षभराचे पाण्याचे नियोजन पावसाळ्यात चार महिने पडणाऱ्या पावसावर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे १ जूनला मान्सूनचे केरळमध्ये आगमन होते. त्यानंतर तो पुढे सरकत सरकत ७ जूनला महाराष्ट्रात पावसाला सुरुवात होत असते. मे महिन्याच्या शेवटी पावसाचे संकेत मिळतात. या वेळी आकाशात बदल होतात. हवामान ढगाळ होते. जोरदार वारे वाहू लागतात. कधी कधी वळवाच्या सरी भूमीला शांत करतात. यंदा पाऊस लांबला. बिपरजॉय चक्रीवादळाचा मान्सूनच्या वाटचालीवर परिणाम झाला असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. अखेर अडथळे पार करून मान्सून केरळमध्ये आला असून तो हळूहळू वरच्या दिशेने सरकत आहे. पावसाचे सर्वाधिक वेध शेतकऱ्यांना लागतात. खरीप हंगाम पारंपरिकपणे जून ते ऑक्टोबर या कालावधीत असतो. ग्रामीण भागात बहुतांश शेतकऱ्यांची खरीपपूर्व शेती मशागतीची कामे पूर्ण झाली आहेत, तर काहींची अंतिम टप्प्यात आहेत. अनेक शेतकरी खते, बी-बियाणे, कीटकनाशके खरेदी करीत आहेत. सरकारने खरीप हंगामपूर्व आढावा बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या आपण पाठिशी आहोत. त्यांना जी जी सामग्री लागेल ती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश संबंधित अधिकारीवर्गाला दिले आहेत. सध्या उन्हाचा तडाखा वाढला आहे. कधी नव्हे इतका उष्मा जाणवत आहे. सकाळी ९ वाजल्यापासूनच उन्हाची किरणे अंग भाजून काढतात. दुपारी १२नंतर तर बाहेर पडणे कठीण होऊन बसते. त्यामुळे सर्वजण पावसाची चातकासारखी आतुरतेने वाट पाहत असल्याचे चित्र आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात यंदा सरासरीच्या ९५ टक्के पाऊस असणार आहे. यामुळे हा पाऊस सामान्य असेल. राज्यात जून, जुलै या दोन महिन्यांत कमी पाऊस, तर ऑगस्ट महिन्यात साधारण पावसाची शक्यता आहे, पण राज्यभर यंदा पावसाचे प्रमाण सरासरीसारखे आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये जूनमध्ये पाऊस सलामी देतो, पण लगेच गायब होतो. त्यानंतर जुलैमध्ये तो जोरदार बसरू लागतो. यंदा पावसाचे आगमन लांबले. केरळमध्ये धडक दिल्यानंतर पाऊस महाराष्ट्रातही दाखल झाल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. ही दिलासादायक बातमी म्हणावी लागेल, पण अद्याप तरी मान्सूनचा प्रभाव दिसत नाहीए. त्यासाठी आणखी थोडी वाट पहावी लागणार असल्याचे दिसते. त्याचे आगमन आपल्या हातात नाही. निसर्गापुढे कुणाचेच चालत नाही. मानव निसर्गाशी जी छेडछाड करीत आहे त्याचेच हे परिणाम सर्वांना भोगावे लागत आहेत. शिवाय पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे बरेचसे पाणी वाहून जाते. या दोन्हींवर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. केवळ शेतकरीवर्गच नाही, तर समस्त मानववर्ग आता येरे येरे पावसा म्हणत आहे. वरुणराजानेही आता जास्त अंत न पाहता जोरदारपणे बरसावे आणि सक्रिय व्हावे, अशीच सर्व जण आळवणी करीत आहेत.**

# उपोषण करण्यात कर्जतकर माहीर.....



समाजाच्या समस्या सुटाव्यात किंवा वैयक्तिक न्याय मिळावा यासाठी मोर्चा, साखळी उपोषण, आमरण उपोषण, आंदोलन, आत्मदहन आदी हत्यारे उचलली जातात. आता माहितीचा अधिकार हेदेखील तीक्ष्ण हत्यार ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पाठपुराव्याने आले आहे. कर्जतकर उपोषणाचा जास्तीत जास्त वापर करतात, कारण त्याचा रिझल्ट हमखास व लवकर होतो. काहींनी दहा-अकरा, तर काहींनी सोळा-सतरा दिवसांपर्यंत उपोषणे करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे उपोषण करण्यात कर्जतकर माहीर आहेत.

१९८०च्या दशकात कर्जत ग्रुप ग्रामपंचायतीसाठी पळसदरी तलाव की पेज नदीमधून पाणी योजना असावी यासाठी झालेले उपोषण अनेकांच्या स्मरणात राहील असे होते की तत्कालीन आमदार तुकाराम सुर्वे यांचा आग्रह पेज नदीवर पाणी योजना करून कर्जत आणि १९ गावांची पाणी योजना करावी असा होता, तर अनंत जोशी, रमेश चंदन आदींचा आग्रह रेल्वेच्या अखत्यारीत असलेल्या पळसदरी तलावाच्या पाण्यावर योजना करावी. म्हणून उपोषणाचे हत्यार वापरले होते. त्या वेळी कर्जत ग्रामपंचायतीसाठी पळसदरी तलावाच्या पाण्यावर योजना केली व दहिवलीसह १९ गावांसाठी पेज नदीच्या पाण्यावर योजना केली. त्या वेळी असलेल्या सरकारने दोघांनाही खुश ठेवण्याचा प्रयत्न केला होता. माथेरानमध्ये एका आजारी असलेल्या ज्येष्ठ नागरिकाला दवाखान्यात जाण्यासाठी रुग्णवाहिका न दिल्याने त्यांच्या मुलाने उपोषण केले आणि त्या मुद्यावर निवडणुकीत तत्कालीन सत्ताधाऱ्यांना सत्तेपासून दूर रहावे लागले होते.

**खबरबात**
**विजय मांडे**

पेण अर्बन बँक बंद झाली आणि अनेक ठेवीदारांचे पैसे अडकले. त्या वेळी उपोषणे करण्यात आली. कारण सर्वांत जास्त पैसे कर्जतकरांचे अडकले होते. ती उपोषणेही लक्षात ठेवण्यासारखी होती. कर्जतच्या उपजिल्हा रुग्णालयातील मनमानीविरुद्ध अनेकांनी उपोषणे केली होती. आरपीआयसारख्या राजकीय पक्षानेही उपोषण केले होते. यासाठी पत्रकारही मागे नव्हते. कर्जत तालुका मराठी पत्रकार संघानेही उपोषण केले होते. कर्जत चार फाटा ते भिसेगाव भागातील श्रद्धा हॉटेल आता बिकानेरपर्यंतचा रस्ता व्हावा यासाठीही उपोषण करावे लागले होते. एसटी आगारातील कर्मचाऱ्यांनीसुद्धा विविध मागण्यांसाठी उपोषणे केली होती. कर्जत शहरात 'ड' सत्ता प्रकारच्या जमिनी आहेत. त्यांची मुदत संपल्याने मोठा प्रश्न उभा राहिला होता. त्या वेळी अरुण गांगल यांच्या पुढाकाराने उपोषण करण्यात आले होते. त्या वेळी तत्कालीन महसूलमंत्री यांनी तो प्रश्न सोडविला.




कोरोना काळाच्या आधी आणि नंतरही दहा-अकरा उपोषणे झाली. ॲड. कैलास मोरेंनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यातील बरीचशी यशस्वीही झाली. कुणी परस्पर जमिनी विकल्या म्हणून उपोषणे केली, तर कुणी जागेतील अतिक्रमण काढावे म्हणून उपोषणे केली. एक उपोषण तर बरेच दिवस चालले. ते घरकुल मिळाले नाही म्हणून होते. पंचायत समितीच्या आवारात ते उपोषण होते. त्यानंतर ते अलिबागला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बरेच महिने होते. रेल्वेने जमिनी संपादित केल्या. त्या वेळी जास्त दर मिळावा म्हणून सुद्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते. त्या वेळी त्याचे नेतृत्व ॲड. गोपाळ शेळके यांनी केले होते. इतकेच काय कर्जतचे प्रवेशद्वार म्हणजे चारफाट्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी नारी शक्ती संघटनेने ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली उपोषण केले होते. ते यशस्वी झाले. कर्जत ठेकेदार संघटनेनेही वारंवार उपोषणे केली होती. या उपोषणांसाठी राहुल डाळिंबकर, अशोक भोपतराव, उदय पाटील आदी पुढाकार घेत असत.

पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम म्हणजे उपोषणाचे 'किंग'च म्हणावे लागेल. त्यांनी आत्तापर्यंत तब्बल १६ उपोषणे केली आहेत. देवस्थान जमीन हडप केल्याप्रकरणी देवाच्या जमिनी देवाच्या नावे करण्यासाठी, बारणे-साळोख रस्ता डांबरीकरण करण्यासाठी, महावितरण कंपनी गलथान कारभारात सुधारणा करण्यासाठी, ७/१२ उताऱ्याचे १५ रुपयांपैकी पाच रुपये शासनाचे शुल्क जमा करणेसाठी अशा अनेक विषयांचा समावेश आहे. कर्जत तालुक्यातील माथेरानच्या डोंगरामध्ये असलेल्या आदिवासी वाड्यांच्या रस्त्याची दूरवस्था झाली असून रस्त्यावर साकव बांधण्यात यावेत या मागणीसाठी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते जैतू पारधी यांनी उपोषण केले होते. साकव मंजूर करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते. कर्जत इंग्लिश मीडियम स्कूलच्या पालकांनीही शाळेच्या गलथान कारभाराविरुद्ध उपोषण केले होते. कर्जत तालुक्याचे टोक असलेल्या बेडीस गावातील आदिवासींनीसुद्धा रस्त्यासाठी उपोषण केले होते.

माजी आमदारांनी रस्त्यांची कामे सुरू व्हावीत म्हणून आमदार असताना फेब्रुवारी २०१९मध्ये उपोषण केले होते. लगेचच रस्त्याची कामे सुरू झाल्याने त्यांनी उपोषण मागे घेतले. काल-परवासुद्धा एक उपोषण झाले. पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील निगुर्ले, तिघर, वरणे प्रास्तार कल्पतरू नावाची कंपनी विकसक म्हणून काम करीत आहे. तेथे स्थानिक युवकांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून ग्रामस्थांनी उपोषण केले होते. ते तब्बल चार दिवस चालले. कैलास म्हामले, अजित पवार हे युवक उपोषणास बसले होते. तीन दिवस झाले तरी न्याय मिळत नाही म्हणून ७० वर्षांच्या मनुबाई पवार यांच्यासह १४ महिला चौथ्या दिवशी उपोषणास बसल्या. तेव्हा प्रशासन हलले आणि मार्ग काढण्याच्या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

विशेष म्हणजे सोमवारपासून कर्जत ते भिसेगाव भुयारी जोड मार्गासाठी उपोषण होणार होते. हे उपोषण सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी करणार होते, मात्र आमदार महेंद्र थोरवे यांनी भिसेगाव ग्रामस्थांना भुयारी मार्गासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन दिल्याने ग्रामस्थांनी कुळकर्णी यांना उपोषण तात्पुरते स्थगित करण्याची विनंती केली. कुलकर्णी यांनी ती मान्य केल्याने उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. एकंदरीत कर्जतकर उपोषण व आंदोलन करण्यात माहीर आहेत हे खरे!.



## बदलते तंत्रज्ञान

# आता ट्विटरद्वारेसुद्धा करता येणार कमाई



मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म ट्विटरचे मालक इलॉन मस्क यांनी नुकतीच एक मोठी घोषणा केली आहे. ट्विटरद्वारे व्हेरिफाइड कंटेंट क्रिएटर्सला लवकरच पैसे दिले जातील, असे इलॉन मस्क यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे आता ट्विटरवर फक्त इलॉन मस्क हेच कमावणार नाहीत, तर लोकही कमावतील.

आपला मुद्दा स्पष्टपणे मांडताना इलॉन मस्क म्हणाले की, जे कोणी व्हेरिफाइड कंटेंट क्रिएटर्स असतील, त्यांना रिप्लायमध्ये दिसणाऱ्या जाहिरातींचे पैसे मिळतील. इतकेच नाही तर पहिल्या ब्लॉकमध्ये ट्विटरद्वारे क्रिएटर्सला ५ मिलियन डॉलर (सुमारे ४१ कोटी रुपये) दिले जातील, असेही इलॉन मस्क यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आत्तापर्यंत कंटेंट क्रिएटर्स इन्स्टाग्राम आणि फेसबुक या मेटा प्लॅटफॉर्मद्वारे कमाई करत होते, परंतु आता ट्विटरदेखील क्रिएटर्सना त्यांच्या सर्वोत्तम कामासाठी पैसे देईल. इलॉन मस्क यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून केलेल्या ट्विटनुसार, इलॉन मस्क यांनी एक अट घातली आहे. यात ज्यांचे अकाउंट व्हेरिफाइड झाले आहे, केवळ त्याच कंटेंट क्रिएटर्सना पेमेंट मिळेल.

तसेच, जेव्हा व्हेरिफाईड अकाउंटवर जाहिरात येईल, तेव्हाच पेमेंट केले जाईल. याचा अर्थ असा की जर तुमच्याकडे ब्लू टिक असेल आणि तुम्ही कंटेंट क्रिएटरदेखील असाल तर तुम्हीदेखील लवकरच Twitter द्वारे कमाई करू शकाल, मात्र जर तुम्ही कंटेंट क्रिएटर असाल पण तुम्ही इलॉन मस्क यांनी लाँच केलेल्या ट्विटरची ब्लू मेंबरशिप घेतली नसेल, तर तुम्हाला पैसे कमवण्याची संधी मिळणार नाही.

जर तुम्हालाही ट्विटरवरून कमाई करायची असेल, तर तुम्ही ब्लू टिकचे पेड सब्सक्रिप्शन खरेदी करून पैसे कमवण्याच्या संधीचा लाभ घेऊ शकता.

# जागतिक बालकामगारविरोधी दिन

बालपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा... असे आपण नेहमी म्हणतो. कारण बालपणीचा काळ सुखाचा आणि आनंदाचा असतो. ना कसली चिंता ना कसली काळजी, मनसोक्त खेळा, हसा, आनंद लुटा... पण असा हा सुखाचा काळ काही मोजक्याच मुलांच्या नशिबात असतो. कारण जेव्हा आपण घराबाहेर पडून समाजात वावरतो तेव्हा पोटाची खळगी भरण्यासाठी सिग्नलजवळ काही वस्तू विकणारी मुले, हॉटेल, बसस्थानक, रेल्वे स्टेशनवर पाणी वाटणारी, टेबल साफ करणारी मुले पाहतो. अशा मुलांना कुठे सुखाचे बालपण अनुभवायला मिळते... कायदा असूनही त्यांचे बालपण हरवत चालले आहे. हेच ते बालकामगार... १२ जून बालकामगार विरोधी दिन त्याविषयी थोडंसं.

१४ वर्षांखालील जी मुले स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार कमवितात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात. एकीकडे बोट ठेवलं ती वस्तू विकत घेऊन देणारी हौशी मॉम-डॅड तर दुसरीकडे कामावर पाठविणारी नाईलाज मायबाप... समाजातील हे चित्र कसे बदलेल आणि कोण बदलणार...? हा समाजापुढे गहण प्रश्नच आहे.



**निमित्त**

१२ जून हा दिवस देशात सर्वत्र बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यात २००४ पासून जिल्हधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविल्या जात आहे. या प्रकल्पांतर्गत ९ ते १४ वयोगटातील धोकादायक, व्यवसायामध्ये काम करणाऱ्या बालकामगारांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यात येते. प्रकल्पाचा मुख्य उद्देश बालकामगारांचा त्यांच्या कामापासून परावृत्त करून शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांच्या पालकांचा आर्थिक स्तर उंचावणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. बालकामगारांना अनौपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कौशल्य व कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध ट्रेडचे व्यवसायपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते तसेच प्रकल्पाचे कार्य व बालकामगार प्रथेविषयी जनमानसात जनजागृती करण्यात येते.

बालकामगारांना प्रकल्पांतर्गत मिळणारा लाभ प्रत्येक बालकामगाराला दरमहा १५० रुपये विद्यावेतन देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी मित्र अभ्यासक्रमाचा विशेष प्रशिक्षण केंद्रात अवलंब करण्यात येतो, शालेय पोषण आहार, पाठ्यपुस्तके आणि आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात, बालकामगारांना त्यांच्या आवडीनुसार तसेच त्यांच्यातील कौशल्यास अनुरूप असे व्यवसाय पूर्ण प्रशिक्षण देण्यात येते, बालकामगारांना विविधांगी उपक्रमातून शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात येते. तसेच जीवन कौशल्य राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत बालकामगारांना जीवन कौशल्य विषयाचा प्रभावी संवाद कौशल्य, स्वत:ची जाणीव, प्रभावी नेतृत्व, निर्णयक्षमता, ध्येय निश्चिती, भावनिक समायोजन, कल्पकता, निरीक्षण निरोगी जीवन यासारख्या विविध विषयांच्या माध्यमातून भावी आयुष्यात सुजाण नागरिक घडविण्याचे प्रयत्न केले जातात.

मुले शिकावी म्हणून अशा अनेक योजना शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत राबविल्या जात आहेत. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाच्या माध्यमातून बालकामगार होवू नये म्हणून सजगता निर्माण केली जात आहे. त्याला जिल्हास्तरावर भरघोस प्रतिसाद मिळत आहे, हेच या प्रकल्पाचे खरे यश आहे.

**(साभार : विकासपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**खोपोली : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वीकेंडला बोरघाटात प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते.** (छाया : जयवंत माडपे)

## आरोग्य प्रहर

# बी १२च्या कमतरतेमुळे अनेक आजारांचा धोका



व्हिटॅमिन आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे आहे कारण यामुळे आरोग्यास अनेक प्रकारे फायदा होतो. आज आपण शरीरासाठी आवश्यक पोषक असलेल्या व्हिटॅमिन बी १२ बद्दल बोलणार आहोत. जर बी १२ ची कमतरता असेल तर आपल्याला ते घ्यावे लागू शकते. शरीरातील या पोषक तत्वाचे काम डीएन तयार करणे आणि फॉलिक सिड शोषून घेणे आहे. त्यामुळे आपण रोजच्या आहारात त्या पदार्थांचा समावेश केलाच पाहिजे, अन्यथा आपण अनेक धोकादायक आजारांना बळी पडू शकतो. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे होणारे नुकसान पाहूया.

व्हिटॅमिन बी १२च्या कमतरतेमुळे होणारे आजार जे लोक व्हिटॅमिन बी १२युक्त पदार्थ खात नाहीत, त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राहत नाही आणि अनेक मानसिक आजार होण्याचा धोका असतो, अनेकांची स्मरणशक्ती कमकुवत होते आणि ते छोट्या छोट्या गोष्टीही विसरू लागतात. त्यामुळे बी १२ची कमतरता भासू देऊ नका.

जर आपण व्हिटॅमिन बी १२ समृद्ध पदार्थ खाल्ले नाहीत तर त्याचा परिणाम आपल्या डोळ्यांवर होऊ शकतो, सामान्यत: लहान अक्षरे वाचताना कमकुवत दृष्टी, अस्पष्ट दृष्टी आणि डोळ्यात दुखणे यासारख्या समस्या.

व्हिटॅमिन बी १२ची कमतरता असेल तर तुम्ही निमियाचे शिकार होऊ शकता कारण अशा वेळी आपल्या शरीरात लाल रक्तपेशींची निर्मिती कमी होऊ शकते, ज्यामुळे रक्त कमी होऊ शकते.

जर तुम्हाला अनेकदा हाडांमध्ये दुखत असेल तर शरीरात व्हिटॅमिन बी १२ची कमतरता आहे हे समजून घ्या आणि शक्य तितक्या लवकर जीवनावश्यक पदार्थ खाण्यास सुरुवात करा, अन्यथा पाठ आणि कंबरदुखी होईल.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# शिरवणेत लवकरच स्वच्छ पाणीपुरवठा

## नेरूळ विभाग अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा



**नवी मुंबई : बातमीदार**

पुढील दोन दिवसांत शिरवणे विभागात होणाऱ्या दूषित पाणीपुरवठ्याची समस्या मार्गी लावली जाईल, तसेच परिसरातील नागरिकांनी स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जाईल, असे आश्वासन विभाग अधिकारी प्रबोधन मवाळे यांनी शिरवणेकरांना पाहणी दौऱ्याप्रसंगी दिले.

मागील एक महिन्यापासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यातच १५ दिवसांपासून दत्तकृपा रहिवासी संघ तसेच मारवाडी चाळ येथील रहिवाशांना येणारे पाणी दूषित व गढूळ असल्याने नागरिक संतप्त झाले होते. त्या पार्श्वभूमीवर मागील २२ मे रोजी शिरवणे गाव, सेक्टर १ परिसराचा पावसाळीपूर्वीचा प्रभागाचा पाहणी दौरा करावा, असे निवेदन माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी ब विभाग अधिकारी नेरूळ प्रबोधन मवाळे यांना दिले होते.

त्या अनुषंगाने माधुरी सुतार यांनी पुन्हा पाहणी दौर करून या नागरिकांच्या तक्रारी सोडवाव्यात, अशी मागणी केली. त्या विषयानुसार विभागीय अधिकारी प्रबोधन मवाळे यांनी ७ जूनला संबंधित विभागाचा पाहण शिरवणे गावातील रहिवाशांना दौरा करत तेथील नागरिकांच्य समस्या जाणून घेतल्या. प्रत्यक्षदर्श त्या भागातील सर्व नाले पूर्णत भरलेले असल्यामुळे सांडपाण्याच समस्या, त्याचबरोबर पिण्याच्य पाण्याच्या तक्रारी जास्त असल्याचे दिसून आले.

या वेळी त्यांनी संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांना तत्काळ तेथे बोलून जाब विचारला तसेच येत्या दोन दिवसांत दूषित पाण्याची समस्य निवारण्यात येईल व शिरवणेकरांन स्वच्छ पाणीपुरवठा होईल, असे त्यांनी आश्वासन दिले.

## चक्रीवादळाच्या इशाऱ्यामुळे जलसेवा तात्पुरती बंद

**उरण : रामप्रहर वृत्त**

हवामान विभागाने खराब हवामान व चक्रीवादळाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे शुक्रवारपासून खबरदारीची उपाययोजना म्हणून मुंबई ते गेटवे- एलिफंटा, मोरा-भाऊचा धक्का, जेएनपीटी या सागरी मार्गावरील प्रवासीसेवा तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

अरबी समुद्रात हवामानात बदल झाले आहेत. समुद्रातील पिरजोय वादळामुळे धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. अरबी समुद्रात मोठमोठ्या लाटा उसळल्याने समुद्र खवळला आहे. इशाऱ्यामुळे प्रवासी वाहतूक बंद केली असल्याची माहिती मुंबई गेटवे जलवाहतूक संघटनेचे सेक्रेटरी मामु मुल्ला यांनी दिली.

# कोपरी गाव परिसरातील गुन्हेगारीचा बंदोबस्त करा

## ग्रामस्थांनी घेतली वरिष्ठ निरीक्षकांची भेट



**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरीगाव परिसरात मोबाईल चोरी, घरफोडीसह अमली पदार्थ विक्री व इतर विविध स्वरूपाच्या गुन्हेगारी घटनांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाढ झाली आहे. सततच्या गुन्हेगारीच्या घटनांनी ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता, कोपरीगाव ग्रामस्थ मंडळाने समाजसेवक परशुराम ठाकूर आणि पुरुषोत्तम भोईर यांच्या पुढाकारातून एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तनवीर शेख यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

या गुन्हेगारी घटनांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी विशेष लक्ष पुरवावे अशी मागणी केली. या वेळी कोपरी ग्रामस्थांनी एपीएमसी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेख यांच्याशी याविषयी चर्चाही केली. ग्रामस्थांच्या तक्रारींचे निरसन करण्याकडे लक्ष दिले जाईल, असे आश्वासन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेख यांनी दिले. त्यानुसार सोमवारी (दि. १२) एपीएमसी पोलीस अधिकारी कोपरी गाव मराठी शाळेत नागरिकांना मार्गदर्शन करणार आहेत. या वेळी ग्रामस्थांसह पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, सहाय्यक निरीक्षक निलेश शेवाळे, संदीप चौगुले, अमोल कर्डीले आदी उपस्थित होते.



# जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची भाजपची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भाजपच्या महिला मोर्चा प्रदेशध्यक्षा अध्यक्ष चित्रा वाघ यांची मानहानी आणि बदनामी केल्याचा निषेध भाजप नवी मुंबईच्या वतीने करण्यात आला.

या वेळी भारतीय जनता पक्ष राज्य उपाध्यक्षा प्रा. वर्षा भोसले, माजी नगरसेविका माधुरी सुतार, मनीषा भोसले, जयश्री दंडवते, उषा माळसेकर यांनी भाजप शिष्टमंडळासह नेरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान भाजप शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.

# शिरवणेतील रस्त्यावर डेब्रिजचे ढीग

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गावातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाल्यांचे स्तान मांडले आहे. अशातच गावातील मुख्य रस्त्यालगत सुरू असलेल्या बांधकामांचे साहित्य, डेब्रिजदेखील पदपथांवर रस्त्यावर ठेवण्यात असल्याचे सर्रास आढळून येते. त्यामुळे शिरवणे गावात वाहतूक कोंडी नियमित होत आहे.



ठाणे-सोलापूर पट्टीतील महत्त्वाचे गाव असलेले शिरवणे गाव मोठी बाजारपेठ आहे. या बाजारपेठेत रविवारी खरेदी करण्यासाठी विविध भागांतून नागरिक येत असतात. अशातच या गावातील मध्यभागी मुख्य रस्त्यालगत इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम जोरात सुरू आहेत, मात्र बांधकाम करताना संधित ठेकेदाराने डेजिचे साहित्य जवळील रस्त्यावर ठेवले असल्याचे दिसत आहे.

शिरवणे गावातून बेलापूरच्या दिशेने जाणाऱ्या मुख्य मार्गावर दोन्ही बाजूस दुकाने आहेत. शिरवणे विभागातून नेरूळ, जुईनगर, सानपाडा वाशी विभागाकडे येणाऱ्या- जाणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड असते. भरघाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावरून चालणारी लहान मुले आणि नागरिकांच्या जीवाला धोका होण्याची दाट शकता आहे.

**शिरवणे गावातील पाहणी दौरा केला आहे. नागरिकांनी तक्रारी केल्या असून लवकरच त्याचे निरसन करू.**

**-प्रबोधन मवाळे, वॉर्ड अधिकारी**

**नेरूळ विभागात रस्त्यावर, पदपथांवर नेहमीच बांधकामांचे साहित्य डेब्रिज पडलेले असते. यामुळे अनेक वेळा रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांना वाहनांचा सामना करावा लागतो. बांधकाम साहित्यामुळे नागरिकांना चालणे मुश्किल होऊन जाते. अतिक्रमण विभागाने यावर कारवाई करावी.**

**-संतोष काळे विभागप्रमुख, नेरूळ आरपीआय**

# राजेंद्र घरत यांना कृतज्ञता पुरस्कार प्रदान

**नवी मुंबई : बातमीदार**

पत्रकार आणि गेली २४ वर्षे मुशाफिरी ही लेखमाला चालवणारे स्तंभलेखक राजेंद्र घरत यांना यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्या नवी मुंबई केंद्राचा २०२३साठीचा पत्रकारिता पुरस्कार शनिवारी (दि. १०) आमदार दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या वेळी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दीप्ती नाखले, नवी मुंबई केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड, सचिव डॉ. अशोक पाटील, कोषाध्यक्ष भाऊसाहेब शिंगाडे उपस्थित होते.

गेली २८ वर्षे पत्रकारितेत सक्रिय असलेल्या घरत यांनी अंधश्रध्दा निर्मुलन, व्यसनमुक्ती, पर्यावरण रक्षण, उपेक्षित महिला-विधवा-परित्यक्ता, अंधशाळेतील विद्यार्थी, कुष्ठरोगी, ज्येष्ठ नागरिक यांच्याबाबतचे विचार केंद्रस्थानी ठेवून लेखन केले असून त्यांची ब्रेल लिपीमध्ये २० पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि आणखी पाच ब्रेल पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.
















उरण : सबका साथ, सबका विश्वास अशी विचारधारा असलेल्या भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्यांचा ओघ सातत्याने वाढत आहे. यालाच अनुसरून उरण विधानसभा क्षेत्रातील विविध पक्षांचे कार्यकर्ते, सरपंच, सदस्य यांनी शनिवारी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत विकासाचे 'कमळ' हाती घेतले. सर्वांचे पक्षात स्वागत करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शनही केले.

# पाऊस लांबल्याने पाणीटंचाई तीव्र

**मुरुड : प्रतिनिधी**

पावसाचे यंदा उशिरा आगमन होत असल्याने ग्रामीण भागात तीव्र पाण्याची समस्या भेडसावू लागली आहे. सुमारे ७२ हजारांची लोकसंख्या असणाऱ्या मुरूड तालुक्यात मुरूड शहर वगळता अनेक ठिकाणी या बिकट काळात पाण्याच्या समस्येला तोंड देत आहेत.



(छाया : संजय करडे)

मुरूड तालुक्यात दरवर्षी २२०० मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस पडूनसुद्धा धरणांची संख्या कमी असल्याने ग्रामीण भागातील लोकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे. तालुक्यात आंबोली धरण आहे. यामध्ये सध्यातरी पाण्याचा साठा मुबलक आहे. येथूनच मुरूड शहराला पाणीपुरवठा होत असल्याने शहरात पाणी समस्या नाही, मात्र ग्रामीण भागाला अनेक ठिकाणी याचा फटका सहन करावा लागत आहे. धरण असलेल्या परिसरात विहीर खणून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला जातो, मात्र धरणातील पाण्याचा पृष्ठभाग सुकल्याने विहिरीतील पाणीसुद्धा आटले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा करणे नामुष्कीची बनले आहे.

विहूर धरणात फक्त ४० टक्के पाणी उरले आहे. त्यामुळे येथील ग्रामपंचायतींनासुद्धा पाण्याच्याटंचाईस सामोरे जावे लागत आहे. त्याचप्रमाणे फणसाड धरणातील पाणीसाठा कमालीची कमी झाला आहे. सध्याचे तापमान ३८ डिग्री सेल्सियस असल्याने धरणातील पाण्याची वाफ होणे तसेच पाणी जलद आटल्याने पाण्याची कमतरता जाणवत आहे.

एकदरा ग्रामपंचायत हद्दीत २८०० लोकसंख्या आहे. या ग्रामपंचायतीला खारआंबोली धरणातून पाणीपुरवठा होतो, परंतु पाण्याची पातळी कमी झाल्याने वेळेवर पाणीपुरवठा करता येत नाही. पाणी अनियमित येत असल्याने येथील लोकांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी मुरूड शहरात यावे लागत आहे.

मुरूड तालुक्यात काही ठिकाणी धरणाच्या पाण्यातून पाणीपुरवठा होत असतो, परंतु मे महिना संपून जून महिन्याचे दहा दिवस उलटले असताना धरणाचे पाणी आटल्याने चिखलसदृश पाणीपुरवठा होत आहे. पाण्याला चिखलाचा वास येत असल्याच्या नागरिकांकडून तक्रारी येत आहेत.

नांदगाव ग्रामपंचायत क्षेत्रात विहिरीद्वारे पाणीपुरवठा केला जातो. हे पाणी पुरवणारी मुख्य विहिरीचे पाणी आटल्याने येथे लोकांना मुबलक पाणी मिळणे कठीण झाले आहे. जेमतेम पाणी मिळत आहे. नांदगाव ग्रामपंचायतीच्या दोन विहिरी असून सध्या दोन दिवसाआड पाणी पुरवावे लागत आहे.

पाणीटंचाईबाबत मुरूड पंचायत समितीमध्ये विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, तालुक्यातील काही ग्रामपंचायतींना पाण्याची टंचाई भासत असून तातडीने सर्वप्रथम आम्ही सावली ग्रामपंचायतीमधील मिठागर भागाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करणार आहोत. याबाबत नांदगाव ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील यांनी सांगितले की, जून महिना अर्धा संपला तरी पावसाची चिन्हे दिसत नाहीत. पाऊस लांबल्याने नांदगाव पंचक्रोशीसह तालुक्यातील ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई आहे. लोकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे.

**शेतकरी चिंतातुर**

**पाऊस लांबल्याने शेतकरीवर्ग मोठ्या चिंतेत आहेत. पारंपरिक पद्धतीने पावसापूर्वी केलेली भाताची पेरणी वाया गेली असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तालुक्यातील वांद्रे येथील धरण मंजूर करून ते लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.**

# आदिवासी ठाकूर समाजाच्या जागेवरील अतिक्रमण नेरळ ग्रामपंचायतीने हटविले

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नंबर २७१ ही जमीन आदिवासी ठाकूर समाजाची राखीव असून या जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते. हे अतिक्रमण नेरळ ग्रामपंचायतीने हटवून आदिवासी समाजाला जागा मोकळी करून दिली आहे. आदिवासी समाजाला आपली जागा मिळाल्याने या ठिकाणी आदिवासी ठाकूर समाज संघटनेचे कार्यालय होणार असल्याने समाजबांधवांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

कर्जत-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर नेरळ ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या नेरळ पोलीस ठाण्याच्या पुढील सर्व्हे नंबर २७१ ही जमीन आदिवासी ठाकूर समाजासाठी राखीव आहे. या जागेवर काही स्थानिकांनी जागा अडवून अतिक्रमण केले होते. याबाबत आदिवासी समाजाने याबाबत आक्रमक होत नेरळ ग्रामपंचायतीला वेळोवेळी जागेसंदर्भातील कागदपत्रे दाखवून अतिक्रमण हटवण्याची मागणी लावून धरली होती.

नेरळ ग्रामपंचायत कार्यालयाकडून अतिक्रमण हटवण्यासाठी येथील ग्रामस्थांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या. दोन-अडीच महिन होऊनही या जागेवरचे अतिक्रमण हटवण्यात येथील रहिवासी तयार नव्हते. अखेर नेरळ पोलिसांच्या बंदोबस्तात ग्रामपंचायतीने कारवाई करीत अतिक्रमण हटवून जागा मोकळी करून दिली. सुरुवातीला काही वेळ ग्रामस्थांमध्ये तणाव होता, परंतु कायदेशीर जागा ही आदिवासी समाजासाठी राखीव असल्याने पोलिसांनीही येथील समजून सांगितल्याने ग्रामस्थ शांत झाले. आता आदिवासी संघटनेचे कार्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



(छाया : विजय मांडे)

# नांदगाव कोळी समाजातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत भागात असणाऱ्या नांदगाव कोळी समाज व मयुरेश हॉस्पिटल तुर्भे-नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव भागातील लोकांना आरोग्य सुविधा मिळावी यासाठी मोफत मधुमेह तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, रक्तामधील हिमोग्लोबिन तपासणी तसेच डॉक्टरांचा सल्ला असे शिबिर ठेवण्यात आले होते.



मयुरेश हॉस्पिटलचे डॉ. अनिकेत सोनावणे यांच्या प्रेरणेने हे शिबिर झाले. योगेश पाटील व सागर डवलेकर यांनी शिबीर आयोजित केले होते. या वेळी विविध तपासण्या करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर येथे आले होते. या शिबिरात ११० जणांची तपासणी करण्यात येऊन डॉक्टरांचे मार्गदर्शनसुद्धा लाभले.

या शिबिराचे उद्घाटन नांदगाव कोळी समाज अध्यक्ष संतोष नथुराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उपसरपंच अस्लम हलडे, उपाध्यक्ष विशाल पाटील, सदस्य मनोज तरे, ज्येष्ठ पंच लक्ष्मण किल्लेकर, अमित भोबू, योगेश पाटील, सागर डवलेकर, डॉ. अस्मा फारूख, मयुरेश हॉस्पिटल ॲडमिन दीपिका मोर्या, मार्केटिंग व्यवस्थापक आसिफ मोमीन आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाली येथे विद्युत खांब व वाहिनीची सुविधा

## भाजप नेते राजेश मपारा यांच्या हस्ते शुभारंभ

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायत हद्दीत कुंभार आळी येथे जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तीन पोल व विद्युत लाईनचा शुभारंभ भाजप प्रदेश सदस्य राजेश मपारा यांच्या हस्ते करण्यात आला. त्यामुळे नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा होणार आहे.



पालीतील कुंभार आळी येथे अनेक दिवसांपासून विद्युत पोलची कमतरता होती. त्यातच दिवसेंदिवस वस्ती वाढत असल्याने मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या विद्युत पोलवर भार पडत असे. परिणामी वारंवार अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असे. ही बाब नगरसेवक गणेश सावंत यांनी भाजप प्रदेश सदस्य राजेश मपारा यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तत्काळ जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून कुंभार आळीसाठी सिंगल फेज पोल उपलब्ध करण्यासाठी शिफारस केली. या निधीतून मंजूर झालेले तीन पोल व विद्युत लाईनचे भूमिपूजन राजेश मपारा यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी ग्रामस्थांच्या वतीने मपारा यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास भाजप अल्पसंख्याक मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस गौसखान पठाण, नगरसेवक गणेश सावंत, भाजप सुधागड तालुका सरचिटणीस सागर मोरे, पाली शहराध्यक्ष उमेश मढवी, रमेश लखिमळे, बाला लखिमळे, किशोर लखिमळे, दीपक लखिमळे, पप्पू गुप्ता, राजकुमार गुप्ता, अच्छेलाल गुप्ता, नंदलाल गुप्ता, रश्मी लखिमळे, गायत्री सावंत, अनुराधा लखिमळे, दीपिका लखिमळे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# धार्मिक भावना दुखावल्याने गुन्हा

**म्हसळा : प्रतिनिधी**

धार्मिक भावना दुखावल्याने दिघी सागरी पोलीस ठाणे अंतर्गत म्हसळ्यातील एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. हा गुन्हा १२ एप्रिल आणि २८ मे रोजी घडला होता, परंतु फिर्याद उशिरा आल्याने आता गुन्हा दाखल झाल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र ढेबे यांनी सांगितले.

दरम्यान, सामाजिक शांतता व सुव्यवस्था बिघडविण्याचा काही अपप्रवृत्तींकडून जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू असल्याचे चित्र संबंध महाराष्ट्रात आहे. त्यामुळे राज्यातील पोलीस यंत्रणा सध्या अलर्ट मोडवर असून सायबर पोलिसांकडूनही संशयास्पद व्यक्तींच्या फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम अकाउंटवर वॉच ठेवला जात आहे.

# नांगरवाडीत पैसा झाला खोटा नाट्यप्रयोग



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी मालाडे गावात नुकतेच सुनील धुमाळ लिखित व दिग्दर्शित पैसा झाला खोटा हे दोन अंकी नाटक सादर झाले. ग्रामस्थ व आजूबाजूच्या गावातील नाट्यरसिकांनी नाटक पाहण्यासाठी गर्दी केली होती.

नाटकात मुख्य अभिनेते म्हणून ॲड. महेश शिंदे हे दुहेरी भूमिकेत दिसले. अभिनेत्री कीर्ती घासे व सृष्टी पाटील या मुख्य स्त्री भूमिकेत होत्या तसेच गावातील कलाकार मोहन धुमाळ, नैनेश पाटील, मयुरेश पाटील, विकास झावरे, शरद गावडे, शिरीष धुमाळ, सुनील धुमाळ, संदेश झावरे, चंद्रशेखर दळवी, प्रतिभा झावरे, प्रज्योती धुमाळ, सुरज धुमाळ, संकेत पाटील, सुशील पाटील व केतन धुमाळ या कलाकारांचा सहभाग होता.

नाटकाची सुरुवात नांदीने झाली. पहिला अंक संपायच्या आत रसिकांची उत्सुकता शिगेला पोहचली होती. नाटकाचे लेखक सुनील धुमाळ हे शिक्षक असून त्यांनी जुगाड्या नावाच्या चित्रपटाची पटकथा ही लिहिलेली आहे. दरवर्षी नांगरवाडी गावामध्ये नाटक होते. मुख्यतः धुमाळ त्याचे दिग्दर्शन करतात. गावातील जास्तीत जास्त कलाकारांना भूमिका देऊन त्यांच्या कलागुणांना वाव देण्यात ते प्रयत्नशील असतात. गावातील कलाकार व इतर सहाय्यक अगदी रंगमंचाचे नेपथ्य ते खुर्च्या लावण्यापासून उचलण्यापर्यंत सगळी कामे करतात. नाटकासाठी लागणारे साहित्यही गावातूनच उपलब्ध केले जाते. कलाकार स्वतःचे कामे सांभाळून काम करतात.

या वर्षी पैसा झाला खोटा या नाटकाची कथा दोन जुळ्या भावांवर आधारित होती. एका भावाच्या अचानक ओढावलेल्या मृत्यूमुळे संपूर्ण घर हादरून जाते. घरातील एका माणसाच्या डोक्यात पैसे मिळवण्याची कल्पना येते आणि सुरू होतो लपाछपीचा खेळ. शेवटी हा खेळ कसा उघडकिस येतो हे पाहण्यासारखे आहे. नाटकातील संवाद व सर्व कलाकारांनी केलेल्या अभिनयाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खुर्चीवर खिळवून ठेवले होते. हे नाटक व्यावसायिक, कौटुंबिक, सामाजिक, भावनिक व रहस्यांनी भरलेले असून याचे प्रयोग अनेक ठिकाणी व्हावेत अशी कलाकारांची इच्छा आहे.

# दिव्यांग विभाग दिव्यांगांच्या दारी!

**दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे. महाराष्ट्रात दिव्यांगांची संख्या तीन लाखाहून अधिक आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या तीन टक्के दिव्यांग आहेत. दिव्यांगांची संख्या कमी करण्यासाठी देशभरामध्ये विविध उपक्रम, योजना राबविण्यात येत आहेत. शासन सेवेत तसेच खाजगी क्षेत्रात दिव्यांगांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. दिव्यांगांच्या सेवा सुविधांमध्ये वाढ करण्यात आली आहे. दिव्यांग व्यक्तींना समान संधी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग यासाठी अधिनियम १९९५ मध्ये कलम ६० अन्वसये अपंग कल्याण आयुक्तालयाची निर्मिती महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागात करण्यात आली आहे.**





आतापर्यंत या सर्व योजनांसाठी दिव्यांग व्यक्तींना त्या- त्या कार्यालयात जावे लागत होते. त्यांचा येण्या-जाण्याचा त्रास कमी व्हावा, तसेच त्यांना शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांचा लाभ घर बसल्या मिळावा, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी या महत्त्वकांशी उपक्रमाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्या दरात उपलब्ध करून दिला आहे.

शासन आपल्या दारी या अभियानाची सुरुवात १३ मे रोजी पाटण येथून संपूर्ण राज्यात झाली. २५ मे म्हणजे केवळ बारा दिवसांत लाखो लाभार्थींची नोंद यात होत आहे. पाटणमध्ये २५ हजारापेक्षा जास्त लाभार्थींना लाभ देण्यात आले. हे महाराष्ट्रातलेच नव्हे तर देशातले एक क्रांतिकारी अभियान आहे. देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थींना लाभ देणारे हे अनोखे अभियान आहे.




शासनाने गेल्या अकरा महिन्यात ३५ कॅबिनेट बैठका आणि त्यातून ३५० निर्णय घेतले आहेत. यापैकी ३० ते ४० निवडक असे ऐतिहासिक निर्णय आहेत की जे महाराष्ट्रासाठी आणि सामान्य जनतेच्या हितासाठी महत्वाचे आहेत. शासन आपल्या दारी या लोकाभिमुख अभियानांतर्गत दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी असा एक निर्णय दिव्यांगांच्या हितासाठी शासनाने घेतला आहे. दिव्यांग बांधवांमध्ये विविध प्रवर्गातील दिव्यांग आहेत. त्यातील अनेक जण विभागीय स्तरावर जाऊन आपली तक्रार नोंदवू शकत नाहीत. त्यामुळे शासनानेच दिव्यांगांना आपल्या अडचणी मांडण्यासाठी उपाययोजना केली, तर त्यांच्यासाठी महत्वाचे ठरेल. त्यामुळे जर शासनच अशा दिव्यांग बांधवांच्या दारी गेले तर खऱ्या अर्थाने दिव्यांगांची सेवा होऊ शकते. जिल्हा स्तरावर शासनाचे सर्व विभागाचे अधिकारी, सर्व शासकीय यंत्रणा एकाच ठिकाणी उपस्थित राहून दिव्यांगांच्या तक्रारी जाणून घेऊन त्याच ठिकाणी कामाचा निपटारा करता येईल. तरी याकरीता दिव्यांग कल्याण मंत्रालय दिव्यांगाच्या दारी हे अभियान शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंमलात आला असून त्यानुसार दिव्यांगांचे एकूण २१ प्रकार निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य शासनाच्या दिव्यांग धोरणामध्ये आरोग्य व तत्सम यंत्रणेमार्फत दिव्यांगत्व येण्यास प्रतिबंध, दिव्यांगत्वाचे शीघ्रनिदान, शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि आरोग्य विमा योजनेचे नियोजन व संनियत्रण करण्याच्या दृष्टीने आवश्यक आधारभूत माहिती इत्यादी बाबींचा दिव्यांग धोरणात समावेश आहे.

दिव्यांगांना दैनंदिन जीवनामध्ये बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच शासकीय योजनांचा फायदा घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी बराच त्रास सहन करावा लागतो. दिव्यांगांना आवश्यक असणारी सर्व प्रमाणपत्रे जसे की, दिव्यांगत्वाचे णऊखऊ प्रमाणपत्र, शेत जमिनीशी संबंधित कागदपत्रे, जात प्रमाणपत्र व अन्य आवश्यक ती प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्हयात शिबीर आयोजित करून प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रमुख मार्गदर्शकांच्या सल्ल्याने एकाच ठिकाणी एक दिवस शिबीर आयोजित करणार आहे. या अभियानात जिल्हयातील सर्व प्रमुख यंत्रणा, अधिकारी तसेच दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या विविध अशासकीय संस्थाही सहभागी होतील. दिव्यांगांच्या शासनाशी निगडीत व उपलब्ध योजनांमधील विविध अडचणी बाबत या शिबीरामध्ये कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांगांना आवश्यक असणारे सर्व प्रमाणपत्रे त्यांना शिबीरामध्येच प्रदान करण्यात येणार असून, त्यासाठी आरोग्य विभागाचे समन्वयक सध्या असलेल्या यंत्रणेबरोबरच आवश्यक ती तात्पुरती यंत्रणा उभारतील. या अभियानाच्या ठिकाणी दिव्यांगांना ने-आण करण्याची व्यवस्था प्रशासनामार्फत करण्यात येणार आहे. कार्यक्रमात दिव्यांगांचे जमिन, जात प्रमाणपत्रे, विविध योजनांची नोंदणी प्रमाणपत्रे व तत्सम शासकीय कामांची पूर्तता करण्यात येणार आहे. या अभियानात घ्यावयाच्या विविध बाबींच्या संदर्भात धोरण व अंमलबजावणीकरीता राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे स्वतः या समितीचे अध्यक्ष आहेत तसेच विविध विभागांचे अधिकारी सुद्धा या समितीचे सदस्य म्हणून काम पाहतील. दिव्यांगाच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या या अभियानात दिव्यांगांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या योजनांतून वा सामाजिक संस्था वा सीएसआर मार्फत उपलब्ध झालेली दिव्यांगांना लागणारी, विविध उपकरणे दिव्यांगांना देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या अभियानाशी संबंधित दिव्यांगांच्या अडी-अडचणी आणि तक्रारींचा निपटारा अभियानादरम्यानच करण्यात येईल.

शासन आपल्या दारी या अभियानाचा शुभारंभ रत्नागिरी जिल्ह्यात नुकताच झाला. त्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तिथे उपस्थित दिव्यांगांना दुचाकी आणि तीन चाकी गाड्यांचे वाटप करण्यात आले.

हे शासन शेतकऱ्यांचे, बळीराजाचे, जनसामान्यांचे, महिलांचे, विद्यार्थ्यांचे आहे समाजातील प्रत्येक घटकाला शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व जनकल्याण योजनांचा लाभ मिळावा हा शासन आपल्या दारी या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

**-प्रवीण डोंगरदिवे,**
**उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण भवन, नवी मुंबई**

फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धा

# श्वीऑनटेका विजेती

## हॅट्ट्रिक साधली



**पॅरिस : वृत्तसंस्था**

पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑनटेकने चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हाचे कडवे आव्हान तीन सेटच्या झुंजीत ६-२, ५-७, ६-४ असे परतवून लावत फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत गेल्या चार वर्षांत तिसरे विजेतेपद पटकावले. विजेतेपद राखणारी श्वीऑनटेक ही दुसरीच महिला टेनिसपटू ठरली. यापूर्वी २००७मध्ये जस्टिन हेनिनने अशी कामगिरी केली होती.

स्पर्धेत एकही सेट न गमावता अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या श्वीऑनटेकला अंतिम लढतीत मात्र एक सेट गमवावा लागला. श्वीआनटेकचे कारकीर्दीमधील हे चौथे ग्रँडस्लॅम विजेतेपद ठरले.

दुसऱ्या मानांकित आरिना सबालेन्काचा पराभव करून प्रथमच अंतिम फेरीत प्रवेश केलेल्या मुचोव्हाकडून श्वीऑनटेकला प्रतिकार होणार हे अपेक्षित होते, मात्र श्वीऑनटेकने दोन वेळा सर्व्हिस भेदताना पहिला सेट सहज जिंकून दमदार सुरुवात केली. विशेष म्हणजे दुसऱ्या सेटलाही दुसऱ्याच गेमला ब्रेकची संधी साधून श्वीऑनटेकने ३-० अशी आघाडी घेतली, मात्र जिगरबाज मुचोव्हाने नंतर सलग तीन गेम जिंकताना प्रथम बरोबरी साधली.

पुढे दोन वेळा श्वीऑनटेकची सर्व्हिस भेदत मुचोव्हाने दुसरा सेट जिंकला. दुसऱ्या सेटला मुचोव्हाने दाखवलेली आक्रमकता जबरदस्त होती. मुचोव्हाचे ओव्हरहेडचे फटके श्वीऑनटेकचा कस पाहत होते. नेटवर येण्याचे मुचोव्हाचे धाडसही यशस्वी ठरले. तिसऱ्या सेटलाही मुचोव्हाने पहिल्याच सेटला ब्रेकची संधी साधून श्वीऑनटेकसमोर आणखी आव्हान उभे केले, पण अनुभवी श्वीऑनटेकने संयम राखले आणि चौथ्या व दहाव्या गेमला ब्रेकची संधी साधून तिसऱ्या सेटसह विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

या विजेतेपदासह इगाने मोनिका सेलेस आणि नाओमी ओसाका यांच्या विक्रमाशी बरोबरी केली. ज्या चार ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या अंतिम फेरीत त्यांनी धडक मारली तेथे विजेते होऊनच त्यांनी सांगता केली. उपविजेत्या कॅरोलिनाचेही कौतुक होत आहे.

## कॅरोलिना मुचोव्हावर संघर्षपूर्ण लढतीत मात

# डब्ल्यूटीसी फायनलमध्ये टीम इंडियाचा पराभव

## ऑस्ट्रेलियाने प्रथमच पटकावले विजेतेपद

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लंडनच्या ओव्हल मैदानात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा फायनलचा सामना रंगला. ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी ४४४ धावांचे तगडे आव्हान दिले होते. या धावांचा पाठलाग करताना भारताच्या फलंदाजांनी हाराकिरी केली. कर्णधार रोहित शर्मा, शुबमन गिल, विराट कोहली आणि अजिंक्य रहाणेसारख्या फॉर्ममध्ये असलेल्या फलंदाजांना बाद करण्यात ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांना यश आले. त्यामुळे ते विजयी झाले.

शेवटच्या दिवशी स्कॉट बोलँडने एकाच षटकात विराट कोहली आणि रवींद्र जडेजाला बाद केले आणि ऑस्ट्रेलियाला विजयाच्या दिशेने नेले. ‘कांगारू’ गोलंदाजांच्या भेदक माऱ्यामुळे भारताचा संपूर्ण डाव ६३.३ षटकात २३४ धावांवर आटोपला. भारताला सर्वबाद करून ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये विजयी झेंडा फडकवला. त्यामुळे आयसीसीच्या या टूर्नामेंटमध्ये भारताचा सलग दुसऱ्यांदा पराभव झाला.

भारतासाठी कर्णधार रोहित शर्माने (४३), शुबमन गिल (१८), चेतेश्वर पुजारा (२७), विराट कोहली (४९), अजिंक्य रहाणे (४६), रवींद्र जडेजा (०), श्रीकर भरत (२३), शार्दूल ठाकूर (०), उमेश यादव (१), मोहम्मद शमी (१३) आणि मोहम्मद सिराजने फक्त एक धाव केली. ऑस्ट्रेलियासाठी नॅथन लायनने चार, स्कॉट बोलँडने तीन, तर मिचेल स्टार्कने दोन विकेट घेतल्या. कर्णधार पॅट कमिन्सला एका विकेटवर समाधान मानावे लागले.

**भारतीय संघ चोकर्स**

जागतिक क्रिकेटमध्ये दादा असणाऱ्या भारताला गेल्या १० वर्षांत एकही आयसीसी ट्रॉफी जिंकता आलेली नाही. त्यामुळे बाय लॅटरल किंग टीम इंडिया हा आयसीसी ट्रॉफीत मात्र नवा चोकर्स ठरतो का, अशी शंका निर्माण झाली आहे. भारताने महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली २०१३मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती, मात्र विराट कोहली आणि रोहित शर्मालादेखील आयसीसी ट्रॉफी जिंकण्यात अपयश येत आहे. महत्त्वाच्या सामन्यांमध्ये संघ कच खाताना दिसून येतो.

# रोहितने टाकले सचिनला मागे

## कसोटीत सर्वाधिक षटकार मारणारा तिसरा भारतीय



**मुंबई : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्माला दुसऱ्या डावात चांगली सुरुवात मिळाली होती, पण त्याला अर्धशतकाने हुलकावणी दिली. या दरम्यान त्याने कसोटीत षटकार मारण्यामध्ये महान सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा रोहित शर्मा आता तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कच्या डावातील सातव्या षटकात दुसऱ्या चेंडूवर रोहितने फाइन लेगच्या दिशेने षटकार ठोकला आणि सचिनला मागे टाकले. रोहितच्या नावावर आता कसोटीत एकूण ७० षटकार आहेत. महान फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावावर या कसोटी क्रिकेटमध्ये ६९ षटकार आहेत.

कसोटीत सर्वाधिक षटकार मारणाऱ्यांच्या यादीत भारताचा माजी अनुभवी सलामीवीर वीरेंद्र सेहवागचे नाव अग्रस्थानी आहे. सेहवागने आपल्या कसोटी कारकिर्दीत ९० षटकार ठोकले. दुसऱ्या क्रमांकावर माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी ७८ षटकारांसह आहे, तर या यादीत रोहित आता तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

# श्रीलंका-पाकिस्तान आशिया कपचे यजमानपद भूषवणार?

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेसंदर्भात बराच काळ पेच आहे. ही स्पर्धा कोणत्या देशात होणार हे स्पष्ट झाले नाही, पण आता समोर आलेल्या अहवालानुसार यंदाची ही स्पर्धा पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन देशांच्या यजमानपदावर खेळवली जाणार आहे. आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी)कडून लवकरच याबाबत अधिकृत घोषणा केली जाऊ शकते.

आशिया चषक २कुठे खेळवला जाणार यावर बराच वेळ चर्चा सुरू होती. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार स्पर्धेतील भारताचे वगळता सर्व सामने पाकिस्तानमध्ये खेळवले जातील तसेच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सर्व सामने श्रीलंकेत होणार आहेत. याशिवाय पाकिस्तान एकदिवसीय विश्वचषकासाठी भारतात येणार असून त्यांना नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळण्यास कोणतीही अडचण नसल्याचेही अहवालात आहे.

एसीसी सदस्य आणि ओमान क्रिकेटचे प्रमुख पंकज खिमजी यांनी होस्टिंगचा प्रश्न सोडवला आहे. त्यांनी सांगितले की, भारताव्यतिरिक्त उर्वरित सामने पाकिस्तानमध्ये होणार आहेत. हे सामने लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळवले जातील. त्याचबरोबर भारत आणि पाकिस्तान आणि भारताचे उर्वरित सामने श्रीलंकेतील गाले किंवा पल्लेकेले येथे खेळवले जातील.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, आयसीसीचे सीईओ ज्योफ अल्लार्डिस आणि चेअरमन




ग्रेग बार्कले पीसीबी चेअरमन नजम सेठी यांची भेट घेण्यासाठी कराचीला गेले असता भारतात होणाऱ्या वर्ल्ड कपमध्ये खेळण्यासाठी पाकिस्तानने कोणतीही अट ठेवणार नाही, असा निर्णय घेतला. आशिया चषक पाकिस्तानमध्ये आयोजित केला जाईल, कारण या स्पर्धेच्या यजमानपदाचा अधिकार पीसीबीकडे आहे.

एसीसी बोर्डाच्या एका सदस्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, ओमान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख पंकज खिमजी, एसीसी कार्यकारी मंडळाचे एक सन्माननीय सदस्य, बहुतेक देशांना हायब्रीड मॉडेल नको असल्याने यावर तोडगा काढण्यासाठी नियुक्त केले होते, पण सध्या लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर पाकिस्तान विरुद्ध नेपाळ, बांगलादेश विरुद्ध अफगाणिस्तान, अफगाणिस्तान विरुद्ध श्रीलंका आणि श्रीलंका विरुद्ध बांगलादेश हे चार गैर-भारतीय सामने होणार आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील दोन सामने आणि सुपर फोरचे इतर सर्व सामने पल्लेकेले किंवा गाले येथे खेळवले जातील.

# अजिंक्यच्या दुखापतीबाबत पत्नीची भावनिक पोस्ट व्हायरल




**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या कसोटी संघाचा माजी उपकर्णधार अजिंक्य रहाणेने जवळपास दीड वर्षाने भारतीय संघात दमदार पुनरागमन केले. त्याने ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात संघ अडचणीत असताना महत्त्वपूर्ण खेळी केली. या खेळीदरम्यान अजिंक्यच्या बोटाला दुखापत झाली. याबाबत त्याच्या पत्नीने सोशल मीडियातून माहिती दिली.

पहिल्या डावात वेगवान गोलंदाजाचा चेंडू अजिंक्यच्या हातावर आदळल्याने तो वेदनेने कळवळत होता, मात्र तरीदेखील अजिंक्यने मैदान सोडले नाही. तो फलंदाजी करीत राहिला अन् भारताला सन्मानजनक स्थितीत पोहचवले. भारताची अवस्था ६ बाद १५२ धावा अशी झाली असताना अजिंक्य रहाणेने आणि शार्दुल ठाकूर यांनी सातव्या विकेटसाठी १०९ धावांची शतकी भागीदारी रचली. शार्दुल ठाकूरने ५१ धावांचे योगदान दिले. दरम्यान, पॅट कमिन्सचा बाऊन्सर हा अजिंक्य रहाणेच्या हाताच्या बोटावर लागल्याने त्याला प्रचंड वेदना होत होत्या, मात्र फिजिओकडून थोडे उपचार घेत अजिंक्यने पुन्हा फलंदाजी करण्यास सुरूवात केली. अजिंक्यने सामना सुरू असताना आपल्या बोटाचे स्कॅन केले नाही. याबाबत अजिंक्यची पत्नी राधिकाने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट लिहिली.

राधिका आपल्या पोस्टमध्ये लिहिते की, तुझे बोट सुजलेले असतानाही तू तुझी मानकिसता बदलली नाहीस. फलंदाजीवर लक्ष केंद्रीत करून स्कॅनदेखील करून घेतले नाही. तू दृढ निश्चिय आणि निस्वार्थ भावना दाखवलीस. तू हार मानली नाहीस आणि क्रीजवर जावून आम्हाला प्रेरित केलेस. मला तुझ्या व्यक्तीमत्वावर गर्व आहे. मी तुझ्यावर खूप प्रेम करते.







# ऑस्ट्रेलियाविरुद्ध विराट कोहलीचे दोन पराक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने दोन पराक्रम केले आहेत.

विराट कोहलीने शनिवारच्या दिवसाच्या खेळात नाबाद ४४ धावा केल्या. या वेळी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच हजार धावांचा टप्पा ओलांडला. असा पराक्रम करणारा तो जगात दुसरा ठरला. या यादीत सचिन तेंडुलकर (६७०७) पहिला, ब्रायन लारा (४७१४) तिसरा, डेसमंड हेन्स (४४९५) चौथा आणि व्हिव रिचर्ड्स (४४५३) पाचवा आहे.



विराट कोहलीने चौथ्या दिवसाच्या खेळात आणखी एक पराक्रमही करून दाखवला. त्याने चौथ्या डावात मैदानात उतरून ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा समाचार घेतला आणि ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी क्रिकेटमध्ये दोन हजार धावांचा टप्पाही पूर्ण केला. विराटने ऑस्ट्रेलियाविरोधात २५ सामन्यांमध्ये ४७.६२च्या सरासरीने ही कामगिरी केली आहेत. यामध्ये आठ शतके आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे. १८६ धावा हा विराट कोहलीचा ऑस्ट्रेलिया विरोधात बेस्ट स्कोअर आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com